



1178







अंक १२ वा

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

# नियतकालिक

मार्च १९७४

विद्यार्थी प्रतिनिधी : व्ही. एस. भोसले : प्रमुख संपादक : प्रा. दयाराम पाटील

# पुणे विद्यापीठ रौप्य महोत्सव

## १९४९–१९७४

भारतातील एक अग्रगण्य विद्यापीठ असा पुणे विद्यापीठाचा लौकिक प्रस्थापित झालेला आहे. अव्वल इंग्रजी अमदानीपासून पुणे शहरास एक महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र म्हणून मान्यता प्राप्त झालेली होती. पुण्याचा समावेश जेव्हा मुंबई विद्यापीठात होता तेव्हाही पुण्याची मोठमोठी महाविद्यालये आणि संशोधन संस्था यांना मुंबई विद्यापीठातही मानाचे स्थान होते.

परंतु जसजसा शिक्षणाचा प्रसार होत गेला तसतशी वेगवेगळ्या विद्यापीठांची स्थापना करण्याची गरज भासू लागली, आणि त्या ऐतिहासिक विकासक्रमातच सन १९४९ मध्ये पुणे विद्यापीठाचा जन्म झाला.

१९४२ मध्ये या प्रश्नाचा सर्वांगीण अभ्यास करून याबाबत सरकारला शिफारस करण्यासाठी नेक नामदार डॉ. बाबासाहेब जयकर यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना झाली. या समितीचा अहवाल १९४३ मध्ये मुंबई सरकारला सादर करण्यात आला आणि अखेर १९४७ मध्ये मुंबई विधानसभेने पुणे विद्यापीठाचे विधेयक संमत केल्यानंतर सदर विधेयकाचे पुणे विद्यापीठ कायद्यात रूपांतर झाले.

मुंबई राज्याचे त्यावेळचे मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री नामदार बाळासाहेब खेर यांच्या विशेष प्रयत्नाने दिनांक १५ एप्रिल १९४८ या दिवशी पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरु म्हणून नेक नामदार मु. रा. ऊर्फ बाबासाहेब जयकर यांची मुंबई सरकारने नेमणूक केली आणि पुण्याच्या प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या परिसरात असलेल्या निझामाच्या अभ्यागत गृहात विद्यापीठाचे कार्यालय त्याच दिवशी सुरू झाले.

गेल्या २५ वर्षांत पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या संख्येत स्थिर स्वरूपाची सतत वाढ होत आली आहे. तसेच पदव्युत्तर पातळीवरील संशोधन आणि अध्यापन या विषयांच्या सोयी अधिकाधिक करण्यात आल्या आहेत.

या महोत्सवाच्या निमित्ताने विद्यापीठाने अनेक शैक्षणिक प्रकल्प हाती घेण्याचे ठरविले आहे व त्यासाठी लागणारा सुमारे ५० लक्ष रुपयांचा रौप्य महोत्सव निधी उभारण्याचा संकल्प केला आहे. या निधीचा विनियोग पुढील काही प्रकल्पांसाठी व्हावयाचा आहे.

(१) संशोधन व विकास संस्थेची स्थापना,
(२) विज्ञान व तंत्रज्ञान सापेक्ष संग्रहालयाची स्थापना,
(३) शर्करातंत्रविषयक काचविज्ञान, सेमीकंडक्टर्स व स्फोटके यांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा प्रारंभ,
(४) खुला रंगमंच व प्रेक्षागृहाची निर्मिती,
(५) पोहण्याचा तलाव व क्रीडांगण विस्तार,
(६) पदव्युत्तर संमिश्र अभ्यासक्रम,
(७) बायोमेट्री विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम,
(८) ऑपरेशनल रीसर्च पदव्युत्तर अभ्यासक्रम,
(९) कॉम्प्युटर केन्द्र.

या प्रकल्पांमुळे विद्यापीठाच्या शिक्षणाची कक्षा अधिकाधिक व्यापक होणार असून विद्यार्थी व अभ्यासकांना त्याचा भरपूर लाभ होणार आहे. शिवाय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांबरोबरच अन्य अभ्यासकांना सहाय्य करणाऱ्या या केंद्रामुळे महाविद्यालयाच्या परिसरातील सांस्कृतिक जीवन समृद्ध होईल अशी अपेक्षा आहे. या रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने विद्यापीठाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत उन्नती करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

" सङ्गरीं वीराग्रणी जे धैर्यमेरू संकटीं
जन्मले या भारती
राष्ट्रचक्रोद्धारणीं कर्णापरी ज्यांना मृती
गाउं त्यांना आरती "

– महाराष्ट्रकवी यशवंत



अनेकान्त एज्युकेशन सोसायटी पुणे

सिद्धिरनेकान्तात्

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

# नियतकालिक

## मार्च १९७४

### संपादक–मंडळ

| | |
|---|---|
| प्रभारी प्राचार्य डॉ. जे. के गोधा | अध्यक्ष |
| प्रा. दयाराम पाटील | प्रमुख संपादक |
| प्रा बी. बी. पाटील | |
| प्रा. आर् एच्. चाफेकर | |
| प्रा. एस् आर्. नवाथे | |
| प्रा. व्ही. व्ही. उपाध्ये | |
| प्रा. डॉ. एस्. एन्. पुराणिक | |
| प्रा. नी. श. लोंढे | |
| प्रा. डॉ. कृ. सं. सुर्वे | |
| प्रा. व्ही. ए. वकील | |
| प्रा. जे. बी. मगदूम | विद्यार्थी प्रतिनिधी |
| श्री. व्ही. एस्. भोसले | |

# विद्यार्थी - प्रतिनिधी

## १९७३-७४

| | | | |
|---|---|---|---|
| १) जनरल सेक्रेटरी | :- | निकम नंदकुमार श्रीरंगराव | टी वाय्.बी.ए. |
| २) इंडियन गेम्स् | :- | जमदाडे सोपान महादेव | एस्.वाय्.बी ए. |
| ३) बॉलगेम्स् व क्रिकेट | :- | मठ सुधीर रामाचार्य | एस्.वाय्.बी.कॉम्. |
| ४) ॲथलेटिक्स | :- | दामोदरे यशवंत रामचंद्र | टी.वाय्.बी.एस्सी. |
| ५) वादविवाद | :- | बांदल सूर्यकांत दत्तात्रय | एस्.वाय्.बी.ए. |
| ६) नियतकालिक | :- | भोसले विठ्ठल सखाराम | टी.वाय्.बी.कॉम्. |
| ७) सहल | :- | चव्हाण प्रताप शंकरराव | एफ्.वाय्.बी.ए. |
| ८) ग्रंथालय | :- | बागवान अब्दुलकरीम हसनभाई | एफ्.वाय्.बी.ए. |
| ९) विद्यार्थिनी प्रतिनिधी | :- | कु. उपाध्ये संध्या वसंत | एफ्.वाय् बी.ए. |
| | | कु. देवकाते कमल संभाजी | टी वाय् बी.ए. |


महाविद्यालयीन जर्नल व स्टेशनरी यासाठी

**फेडरल को-ऑप. स्टोअर्स**

पुणे विद्यापीठ

गणेशखिंड : पुणे - ७


॥ सिद्धिरनेकान्तात् ॥

# संपादकीय

**महाविद्यालयाचे एक तप :**

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची एका तपाची वाटचाल सर्वांच्या दृष्टीसमोर आहेच. या एका तपाच्या वाटचालीत महाविद्यालयाने शैक्षणिक दृष्टया सर्वांगीण प्रगती केली असून पुणे विद्यापीठात एक प्रगतीशील महाविद्यालय म्हणून लौकिक संपादन केला आहे. बारा वर्षातील महाविद्यालयाच्या समग्र प्रगतीचे चित्र जनता-जनार्दना समोर आहेच.

**विद्यापीठ परीक्षा निकाल मार्च-एप्रिल १९७३.**

| वर्ग | परीक्षेस बसलले विद्यार्थी | प्रथम वर्ग | द्वितीय वर्ग | पास वर्ग | एटी केटी | पासाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| पी. डी. आर्टस | २८८ | ४ | १४३ | ७१ | – | ७५·६ |
| पी. डी. सायन्स | ९० | १७ | ३२ | १० | – | ६५ ६ |
| पी.डी. कॉमर्स, नवा अभ्यासक्रम | ९३ | ४ | ४० | २६ | – | ७५·२७ |
| पी डी कॉमर्स, जुना अभ्यासक्रम | २ | – | १ | १ | – | १०० ०० |
| एफ्. वाय बी. ए. | १६८ | – | – | १४३ | ९ | ८५ १२ |
| एफ. वाय. बी. एस्सी. | ६४ | ९ | २५ | ४ | ८ | ५९ ३७ |
| एफ्. वाय. बी. कॉम. | १०९ | – | – | ६६ | १६ | ६०·५ |
| एस्. वाय. बी. एस्सी. | २६ | – | – | १९ | ६ | ७६·०० |
| एस्. वाय. बी. कॉम. | ५८ | – | – | २८ | २७ | ४८·२८ |
| टी. वाय. बी. ए. | १०२ | – | ३६ | ३५ | – | ६९·६ |
| एस. वाय., टी. वाय. बी.कॉम | ६३ | – | १४ | ३ | – | २८·५ |
| टी. वाय. बी. कॉम. | २७ | – | १८ | ३ | – | ७७·७ |
| टी वाय. बी. एस्सी. | १८ | १४ | ३ | – | – | ९४·४ |
| एम. ए (मराठी) | १० | – | ६ | ४ | – | १००·०० |
| एम. ए. (सी व डी ग्रुप) | ४ | – | १ | – | – | २५·०० |
| एम्. कॉम्. | ९ | – | ४ | १ | -- | ५५·६ |

टीप :- १) एस्. वाय्. बी. ए. चा रिझल्ट नसतो.
२) एफ्. वाय्. बी. ए. व बी कॉम्. चे वर्गांना क्लास जाहीर केला जात नाही.
३) श्री. भाटिया जगन्नाथ देवकीनंदन या आपल्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा पी. डी. कॉमर्स (जुना कोर्स) मध्ये पुणे विद्यापीठात पहिला नंबर आलेला आहे.

**आमचे प्राचार्य**

प्राचार्य एस्. जी. भोरे हे दीर्घ मुदतीच्या रजेवर गेल्यामुळे त्यांच्या जागी प्रभारी प्राचार्य म्हणून प्रा. डॉ. जे. के. गोधा यांची नियुक्ति झाली आहे.

त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे कामकाज व्यवस्थित चालले आहे.

**आमचे प्राध्यापक**

आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापक आपल्या अध्ययनकार्यांबरोबरच शैक्षणिक क्षेत्रात अन्य स्वरुपाची आवश्यक ती सेवा संधी मिळेल तेव्हा करीत असतात यावर्षी पुढील प्राध्यापकांनी विविध प्रकारचे कार्य केले आहे.

**प्रा. दयाराम पाटील**

दिनांक ५।९।७३ - कोऱ्हाळे बु. ता. बारामती येथे गणेशोत्सवात 'संघटनचे महत्त्व' या विषयावर भाषण.

दिनांक २।१०।७३ - एस्. एस एम्. हायस्कूल माळेगांव येथे म. गांधी जयंती निमित्त व्याख्यान

दिनांक २१ व २२।१।७४ - पुणे विद्यापीठ बहि:शाल मडळाच्या वतीने श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर येथे 'महाराष्ट्रातील विचारवंतांची परंपरा' या विषयावर व्याख्यान

दिनांक २६।१।७४ - म. गांधी बालक मंदिर, बारामती येथे ध्वजवंदन व पारितोषिक वितरण

**प्रा. डॉ. एस्. एन्. पुराणिक**

यांचे पुढील संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले —

१] वारली – एक बदलती वन्य जमात !
समाजप्रबोधनपत्रिका - फेब्रुवारी १९७४

2] Administration and Politics in the Context of Panchayat Raj.
'The Indian Journal of Public Administration' March 1974

**प्रा. डॉ. के. एम्. सुर्वे**

दिनांक ४।९।७३ - महाराष्ट्र विद्यालय, पणदरे येथे गणेशोत्सवानिमित्त 'हमारे धार्मिक उत्सव और विज्ञान' या विषयावर भाषण

दिनांक ५।९।७३ - एम्. ई. एस्. हायस्कूल, बारामती येथे 'धर्म और विज्ञान' या विषयावर भाषण

दि. २२।९।७३ - कर्मवीर भाऊराव पाटील जयंती-निमित्त न्यू इंग्लिश स्कूल, कोऱ्हाळे येथे 'जनतेचे ज्ञानदीप अण्णा' या विषयावर भाषण

**प्रा. व्ही. व्ही. आचार्य**

'The Current Price Situation in India' या विषयावरील निबंध स्पर्धेत त्यांना गोखले इन्स्टिटयूट ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिक्स, पुणे-४ या संस्थेकडून पन्नास रुपयाचे पारितोषिक मिळाले.

या वर्षी पुढील सहकारी आम्हाला लाभले, त्यांचे आम्ही हार्दिक स्वागत करतो.

श्री. लेकावळे व्ही. एल. हे पुढील शिक्षणासाठी ग्वाल्हेरला गेले.त्यांचे जागी शारिरीक शिक्षण विभाग प्रमुख म्हणून श्री. ए. एस्. मेहेर यांची नियुक्ति झाली आहे.

राज्यशास्त्रासाठी - प्रा. डॉ. एस. एन. पुराणिक व प्रा. व्ही. डी. काकडे

अर्थशास्त्रासाठी - प्रा. ए. बी. देसाई, प्रा. व्ही. व्ही. आचार्य

इंग्रजी विभागात प्रा. पी. एन्. कुलकर्णी

प्रायोगिक मानसशास्त्र विभागासाठी प्रा.कु.सुरेखा घाटे

मराठी विभागात प्रा. आर. टी. शहा

अकौंटन्सी व कॉस्टींगसाठी प्रा. एस. एन. देशपांडे

पुढील प्राध्यापक अन्यत्र गेले, त्यांना आम्ही सुयश चिंतितो प्रा. व्ही. के. देव, प्रा. नायगांवकर, प्रा. मोरगांवकर प्रा. उपासनी आणि प्रा. शिंदे

**आमचे विद्यार्थी**

कु. रेखा भागवत एम्. ए. मराठी, द्वितीय वर्ष यांना पुणे येथील एकता मासिकाने युवकांच्यासाठी आयोजित केलेल्या 'हे युवक काय देशाचा इतिहास घडवतील' या विषयावरील निबंध स्पर्धेत शंभर रुपयाचे पहिले पारितोषिक मिळाले. तसेच अभिनव भारत मंदिर, नाशिक या संस्थेने कवि गोविंदांच्या जन्मशताद्विनिमित्तच्या निबंध स्पर्धेत पंचाहत्तर रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळाले

श्री. सदानंद करंदीकर एम्. ए. मराठी, द्वितीय वर्ष यांच्या पुढील कविता 'जिप्सी' या नियतकालिकात प्रसिद्ध झाल्या आहेत.

जुलै १९७३ - अक्षर वाङ्मय, फिनिक्स पाखरे



जानेवारी ७४ - पण....

फेब्रुवारी ७४ - पारावरचा मुंजोबा, साक्ष

अन्य वाङ्मयीन लेख वेळोवेळी प्रसिद्ध झाले आहेत.

अनिल गलांडे द्वितीय वर्ष बी. ए.

'पंचदीप' मासिकातून पुढील कविता प्रसिद्ध झाल्या आहेत.

१ मे ७३ - हे नभांनो, हरितक्रांती

१५ ऑगस्ट ७३ - सिंचन

१४ नोव्हेंबर ७३ - क्रांती, शांतिदूत

कु. सुषमा देशपांडे एस्. वाय्. बी. ए. व श्री. सुशीलकुमार राणे

नाट्य साधना, बारामती या संस्थेने यावर्षी महाराष्ट्र राज्य अनागरी स्पर्धेत सादर केलेल्या - 'हॅलो मी बोलतोय' या नाटकाला प्रथम पारितोषिक मिळाले. तसेच आमच्या या विद्यार्थ्यांना अभिनयाची गुणवत्ता प्रमाणपत्रे मिळाली याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनदन!

**महाविद्यालयाची नियोजित इमारत–**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या दिवसेंदिवस वाढणाऱ्या संख्येमुळे उपलब्ध इमारती अपुऱ्या पडू लागल्या म्हणून संस्थेने नियोजित इमारतीच्या बांध–कामाची योजना हाती घेतली आहे.

या नियोजित इमारतीचा भूमिपूजन समारंभ दि. २।९।७३ रोजी राज्यमंत्री ना. श्री. शरद्चंद्र पवार आणि सौ. प्रतिभाताई पवार यांच्या शुभहस्ते पार पडला.

या इमारतीच्या बांधकामासाठी लागणारी रक्कम उभी करण्याच्या दृष्टीने संस्थेने ठेवी स्वीकारण्याची योजना तयार केली असून त्यात प्राध्यापकही सहभागी होणार आहेत. या योजनेत मा. ना. श्री. शरद्चंद्र पवार यांनी स्वत:चे पाच हजार रुपये बिनव्याजी ठेव म्हणून इमारतीच्या बांधकामासाठी दिले आहेत. तसेच श्री. गरगटे, बारामती यांनीही पाच हजार रुपये ठेव म्हणून इमारतीच्या बांधाकामासाठी दिले असून अनेक मान्यवरांनी ठेवी देण्याचे आश्वासन दिले आहे.

**विद्याप्रतिष्ठान–**

गतवर्षी विद्याप्रतिष्ठान या संस्थेने आमच्या महाविद्यालयातील दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांसाठी दोन्ही वेळ पोटभर जेवण्याची विनामूल्य व्यवस्था केली होती. या योजनेचा अडीचशे विद्यार्थी फायदा घेत होते. हीच योजना यावर्षी देखील जून १९७३ ते १५ ऑक्टो. १९७३ पर्यंत सुरू होती. त्यातही २५० विद्यार्थी सह–भागी झाले होते. गतवर्षी व यावर्षी मिळून विद्या–प्रतिष्ठान या संस्थेने आमच्या विद्यार्थ्यांची निकडीची गरज लक्षात घेऊन दीडलाख रुपये विद्यार्थ्यांच्या भोजनव्यवस्थेसाठी खर्च केले. विद्याप्रतिष्ठानचे हे कर्तृत्व व दार्तृत्व खरोखरच असामान्य आहे. याला तोड नाही असे म्हणावे लागेल.

या कामी त्यांना माळेगाव सहकारी साखर कारखाना व भवानीनगर येथील छत्रपति सहकारी साखर कारखाना यांनी बहुमोल साहाय्य केले. यास्तव आम्ही विद्याप्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. ना श्री. शरद्चंद्र पवार, उपाध्यक्ष व बारामती नगर परिषदेचे लोकप्रिय अध्यक्ष श्री. विनोदकुमार गुजर, विद्याप्रतिष्ठानचे चिटणीस श्री. शरद वाडकर, खजिनदार, श्री. खुशालचंद छाजेड, विद्याप्रतिष्ठान संस्थेचे सर्व सदस्य तसेच माळे–गाव व भवानीनगर येथील सहकारी साखर कारखा–न्याचे चेअरमन, सर्व सदस्य यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत. असेच सहकार्य त्यांनी यापुढेही आम्हास द्यावे अशी विनंती आहे.

**विद्याप्रतिष्ठान संस्थेच्या वतीने विद्यार्थी विद्यार्थिनींच्या वसतिगृहाची योजना–**

बारामती येथील तुळजाराम चतुरचंद कॉलेजच्या परिसरात विद्याप्रतिष्ठान या संस्थेने विद्यार्थिनींचे वसतिगृह बांधण्याची योजना तयार केली असून त्याची सुरुवात म्हणून–

ना. शरद्चंद्र पवार आणि सौ. प्रतिभाताई पवार यांच्या शुभहस्ते या वसतिगृहाचा भूमिपूजन समारंभ सोमवार ता. ५–११–७३ ला सकाळी सव्वादहा वाजता पार पडला.

सुरवातीलाच– अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार श्रीमान् माणिकलाल तुळजाराम शहा (वाघोलीकर) यांनी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या गव्हर्निंग कौन्सिलने विद्याप्रतिष्ठान या संस्थेला विद्या-र्थिनींचे वसतिगृह बांधण्यासाठी संस्थेची जागा देण्याचा ठराव एकमताने मंजूर केला असून तो विद्याप्रतिष्ठानचे अध्यक्ष ना. शरद्चंद्र पवार यांनी स्वीकारावा अशी विनंती केली.

त्यानुसार ना. पवार यांनी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचा हा ठराव स्वीकारल्याचे जाहीर करून

विद्याप्रतिष्ठान ही संस्था बारामती तालुक्यातील महाविद्यालयीन व विद्यालयीन क्षेत्रातील अडी–अडचणींची सोडवणूक करण्याच्या उद्देशानेच कार्य करीत आहे. ग्रामीण भागातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांचे शिक्षण आर्थिक अडचणीमुळे थांबू नये, ह्या दृष्टीने लक्ष देते व आवश्यक ती मदत करते. त्यापैकीच हे एक कार्य आहे. बारामती येथे विद्यार्थिनींचे वसतिगृह नव्हते. त्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची विशेषत: ग्रामीण भागात राहणाऱ्या विद्यार्थिनींची कुचंबणा होत असे. ही अडचण लक्षात घेऊन विद्याप्रतिष्ठानने अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या सहकार्याने हे पाऊल उचलले आहे. विद्यार्थिनींची सोय असलेले व अद्यावत सुखसोईनीं युक्त असलेले हे वसतिगृह लवकरच पूर्ण होणार आहे. या वसतिगृहाने विद्यार्थी–विद्यार्थिनींची उच्च शिक्षण घेण्याची एक महत्त्वाची अडचण नाहीशी होईल.

**महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई ने दिलेली रु. ११,००१ ची देणगी–**

महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई या संस्थेने गतवर्षी बारामती येथील जिनिंग फॅक्टरीतील फेडरेशनने खरेदी केलेल्या कापसाला दि. ३।२।७३ रोजी अचानक आग लागली. त्यावेळी आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आग विझविण्यात मोलाची कामगिरी केली. विद्यार्थ्यांनी केलेली ही कामगिरी लक्षात घेऊन फेडरेशनचे अध्यक्ष माननीय दे. भ. श्री. रत्नाप्पाण्णा कुंभार यांनी रु. ११,००१ ( अकराहजार एक ) ची देणगी आमच्या संस्थेला देऊन उपकृत केले.

आमच्या विद्यार्थ्यांच्या कार्याची माननीय रत्नाप्पाण्णांनी जी दखल घेतली त्यावद्दल आम्हाला धन्यता वाटते.

**पुणे विद्यापीठाचे कुलगुरु रँग्लर ग. स. महाजनी यांची भेट--**

२३।६।७३ रोजी महाविद्यालयाचा अकरावा वर्धापन दिन कुलगुरु डॉ. ग. स. महाजनी यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. त्यावेळी केलेल्या भाषणात महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीबद्दल कुलगुरूंनी समाधान व्यक्त केले आणि विद्यार्थ्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव करून दिली. आपल्या जीवनात ज्यांचे ज्यांचे म्हणून ऋण असते त्याचे स्मरण आपण सतत ठेवावे. विद्यार्थ्यांनी हे ऋण फेडावे. ज्या संस्थेने आपले व्यक्तित्व घडविले त्यावद्दल कृतज्ञता बाळगावी. या महाविद्यालयाने गौरवास्पद यश मिळविले आहे. त्याचा उत्तरोत्तर असाच उत्कर्ष होत जावो अशी सदिच्छा कुलगुरूंनी व्यक्त केली.

**पुणे विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन व विभागीय सामने –**

आंतर महाविद्यालयीन व विभागीय खो-खो [ मुले-मुली ] व मैदानी स्पर्धा झाल्या दि ५ डिसेंबर ते १० डिसेंबर १९७३ यावर्षीच वरील सामने भरविण्याची फार मोठी जबाबदारी आमच्या महाविद्यालयाने स्वीकारली होती. त्यासाठी खेळाचे मैदान तयार करण्याचे फार मोठे काम होते ह्या सामन्यासाठी चारशे मिटर्सचा सहा लेन्सचा स्टॅन्डर्ड ट्रॅक तयार करण्यात आला होता.

या कामासाठी माळेगांव सहकारी साखर कारखान्याने आठ दिवस आपला रोलर देऊन आम्हास बहुमोल सहाय्य केले याबद्दल आम्ही मॅनेजिंग डायरेक्टर श्री. धर्माधिकारी साहेब, चेअरमन साहेब; सचालक व सर्व सभासदांचे अत्यंत ऋणी आहोत.

सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यानेही आपला रोलर ग्राऊंडच्या कामासाठी दहा दिवस देऊन आम्हास उपकृत केले आहे. त्यास्तव आम्ही चेअरमन साहेब श्री. मुगुटराव काकडे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. भोसले साहेब, मुगुटराव महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. सुशीलाताई आठवले यांचे आभारी आहोत.

भवानीनगर येथील श्री छत्रपति सहकारी साखर कारखान्यानेसुद्धा आपला रोलर एक आठवडा देऊन फारच मदत केली, याबद्दल आम्ही सचालक श्री. आप्पासाहेब पवार कारखान्याचे चेअरमन व सर्व सभासद यांचे हार्दिक आभार मानतो आणि पुढेही असेच सहकार्य त्यांनी द्यावे अशी विनंती करतो.

श्री. राजाभाऊ उंडे यांनीही आम्हास मौलिक सहाय्य केले. बारामती नगर परिषदेने उत्तम सहकार्य दिले, याबद्दल नगर परिषदेचे अध्यक्ष श्री. विनोदकुमार गुजर, उपाध्यक्ष श्री. श्रीपालशेठ मुथा व नगर परिषदेचे सर्व सदस्य या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.



बारामती येथील मिशन संस्थेच्या प्रमुख मिस् हॅशल स्कूज यांनी बहुमोल मदत केली. तसेच एम्. ई. एस्. हायस्कूल, मिशन हायस्कूल, शाहू हायस्कूल, राधेश्याम टेक्निकल हायस्कूल यांनी आवश्यक ते सहकार्य देऊन आमचे कार्य यशस्वी केले याबद्दल आम्ही सर्वश्री बी. जी. घारे, वाघमोडे, बनजवडे, गायकवाड या सर्वांचे आभारी आहोत.

येथील डेप्युटी इंजिनिअर श्री. थोरात साहेब, सर्वश्री. हेरेकर, डफळ, बिधरी यांनीही योग्य ते सहाय्य आम्हास केले.

या सर्व मान्यवर संस्था व व्यक्तींच्या सहकार्यामुळेच हे सामने आम्ही यशस्वी करू शकलो. या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो

**विविध विषयांच्या अध्यापनाची सोय--**

जून १९७४ पासून आमच्या महाविद्यालयात टी. वाय् बी. ए. साठी हिन्दी ( स्पेशल ) तसेच एस्. वाय्. बी. ए. साठी मिलिटरी स्टडी या विषयांच्या अध्यापनाची सोय उपलब्ध करून देणाच्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत.

**मान्यवरांचा सन्मान--**

दि. २६ जानेवारी १९७४ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या शुभप्रसंगी राष्ट्रपतींनी विविध क्षेत्रातील व्यक्तींना त्यांच्या त्या त्या क्षेत्रातील कर्तृत्वाबद्दल बहुमान जाहीर केले आहेत. त्यात डॉ. हसमुख धीरजलाल सांकलिया, संचालक, डेक्कन कॉलेज पुणे, डॉ. वसंत शंकर हुजूरबाजार, प्रमुख गणित शास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ प्रसिद्ध शिक्षण तज्ज्ञ, श्री. जयंत पांडुरंग नाईक ह्यांना पद्मभूषण ही बहुमानाची पदवी देऊन त्यांचा शिक्षण क्षेत्रातील कामगिरीबद्दल गौरव केला. तसेच पुणे विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. ह. जी. अर्णीकर यांना महाराष्ट्र शासनाने त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील बहुमोल कामगिरीबद्दल राज्य पुरस्कार देऊन गौरव केला.

या बद्दल या सर्व मान्यवरांचे आम्ही हार्दिक अभिनंदन करीत आहोत.

**ऋणनिर्देश--**

या अंकाची निर्मिती करताना आमचे प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले. संपादक मंडळातील प्रा. बी. बी. पाटील यांनी सर्व प्रकारचे मार्गदर्शन केले तर प्रा. रघुनाथराव चाफेकरांनी जाहिरात विभागाचे प्रमुख म्हणून उत्तम सहकार्य केले. प्रा. शरद नवाथे यांनी सजावट, फोटोंची मांडणी या संदर्भात सहकार्य दिले. प्रा. डॉ. सुर्वे यांनी सर्व प्रकारचे साहय केले. या शिवाय प्रा. उपाध्ये प्रा. डॉ. पुराणिक, प्रा. लोंढे; प्रा. वकील, प्रा. जे. बी. मगदूम, प्रा. किणिगे व विद्यार्थी प्रतिनिधी श्री. व्ही. एस्. भोसले व जनरल सेक्रेटरी नंदकुमार निकम यांचे उत्तम सहकार्य मिळाले.

विद्यार्थी बंधु - भगिनींनी साहित्याचा विपुल पुरवठा केला. लोकसंग्रह कारखाना, पुणे यांनी सुंदर मुखपृष्ठ व ब्लॉकनिर्मिती करून दिली, तर ज्योती प्रेस फलटणचे श्री. शहा बंधू यांनी सुंदर व सुबक छपाई करून दिली. याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. जाहिरातदारांनी जाहिराती देऊन आमच्यावरील लोभ कायम ठेवला. या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. या सर्वांनी आमच्यावर असाच लोभ ठेवावा ही विनंती.

आपला

दिनांक १५।३।७४

**दयाराम पाटील**

प्रमुख संपादक

# पुणे विद्यापीठ रौप्य महोत्सव निधी

या वर्षी पुणे विद्यापीठाचा रौप्य महोत्सव साजरा करण्यात येत आहे.

पुणे विद्यापीठाने भारतातील एक अग्रगण्य विद्यापीठ म्हणून आपला लौकिक प्रस्थापित केलेला आहे.

मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी महाराष्ट्रात पुणे विद्यापीठाची स्थापना झाली आणि विद्यापीठाने हे कार्य मोठ्या जिद्दीने केले. १९४८ पासून १९५६ पर्यंत डॉ. बाबासाहेब जयकर यांच्या कुशल नेतृत्वाने ही वाटचाल झाली आणि हीच कुलगुरूंची तेजस्वी परंपरा डॉ र. पु. परांजपे, प्रा. द. गो. कर्वे, प्रा. म. म. दत्तो वामन पोतदार, डॉ. न. वि. गाडगीळ, डॉ. हु. वि. पाटसकर, डॉ. बा पां. आपटे, डॉ. ग. स. महाजनी ह्यांच्या रूपाने चालू राहिली.

आज रँग्लर, ग स. महाजनी सारख्या मान्यवर कुलगुरूंच्या कारकीर्दीत हा महोत्सव साजरा होत आहे, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. या प्रसंगी विद्यापीठाने महत्त्वाच्या विविध योजनांचे संकल्प सोडले असून त्या संकल्पांना मूर्त स्वरूप आणण्यासाठी विद्यापीठाने रौप्यमहोत्सव निधी उभारला आहे. या निधीला आमच्या संस्थेच्या वतीने पुढीलप्रमाणे सहाय्य करण्यात आले आहे.

| | रु. | पैसे |
|---|---|---|
| महाविद्यालयातील प्राचार्य व प्राध्यापक वर्ग | ६११ | ०७ |
| विद्यार्थी–विद्यार्थिनी | | |
| लेखनिक | १५२६ | ०० |
| सेवक वर्ग | २७ | ७७ |
| अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या लोकल–कमिटीचे सभासद | ३० | ०० |
| विद्यार्थी व प्राध्यापक यांनी गावातील नागरिकांकडून मिळविलेली रक्कम | २६१ | ०० |
| | १३३ | ०० |
| | २५८८ | ८४ |

या शिवाय अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी व पुणे विद्यापीठ कोर्टाचे सभासद डॉ. वर्धमान कोठारी यांनी विद्यापीठ कोर्टाच्या बैठकीसाठीं मिळणाऱ्या भत्त्यात स्वतःची रक्कम टाकून एक हजार एक रुपये विद्यापीठास दिले आहेत.

—०—

**विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ–**

या वर्षीच्या विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाने महाविद्यालयास एक मोठा आरसा भेट म्हणून दिला. तसेच जनरल सेक्रेटरी श्री. नंदकुमार निकम यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे एक भव्य छायाचित्र महाविद्यालयास भेट दिले आहे.



**'Central At Your Service'**

**If you have plans to start.**

1) A SMALL SCALE INDUSTRY OR
2) If you are a Professional like an Engineer, a Chartered Accountant, a Lawyer, a Doctor etc. or
3) A Small ARTISAN or a small Retail Trader or
4) A POST GRADUATE STUDENT wanting to pursue studies in Scientific Technology, Industrial or Commercial subject in India or abroad or

WE CAN HELP YOU. — —

5) If you have children for whose MARRIAGE; EDUCATION EXPENSES you wish to provide or
6) If you have a few years left to RETIRE and want to enter our DOUBLE Benefit Scheme [ Retirement Benefit Scheme ] or
7) If you are an AGRICULTURIST, who can also assist you in innumerable ways.
8) If you are going on a BUSINESS TRIP OR A HOLIDAY, why not carry our Travellers Cheques which are issued FREE of commission.
9) If you are a housewife, we can also help you by providing easy loans for purchase of household goods like Sweing Machine, Furniture, Transistor, Cooking Utensils Fans etc., Subject to certain rules.
10) To ex–servieman disabled during recent Indo–Pak conflict and widows dependents of Jawana killed in action 'CENTRAL' will allow 1/2% higher rate of interest on their deposits from 1st January 1972.

WE HAVE MANY–MANY SCHEMES–WHY NOT CALL ON US TODAY?

11) All you need is Rs. 5/– to open all HSS Accounts.
12) Even children above 14 can open HSS ACCOUNTS and independently operate them.
13) We can also pay your monthly interest on your deposits kept with us.
14) Please remember your earnings upto Rs. 3,000/– by way of interest from Bank Deposits is EXEMPT FROM INCOME TAX

(a) Also your deposits upto Rs. $1\frac{1}{2}$ lacs are axempt from Wealth Tax.

SERVING the Country with over 1047 branches.
THE BANK that goes out to peoples and places.
CALL on us today to solve your problems

*Central Bank of India.*
*H. O. Mahatma Gandhi Road, Bombay.*

बारामती नगरपरिषदेच्या विद्यमाने
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय द्वारा आयोजित

# कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वाद व वक्तृत्व स्पर्धा

बारामती नगरपरिषदेने दिलेल्या अनुदानानुसार यंदा आमच्या महाविद्यालयामार्फत प्रसिद्ध मराठी कवि मोरोपंत ह्यांचे स्मरणार्थ वाद व वक्तृत्व स्पर्धा सुरू करून दोन्ही संस्थांनी अत्यंत प्रशंसनीय कार्य केले आहे दोन्ही स्पर्धांसाठी दोन वेगळ्या ढाली तयार करण्यात आल्या व रु. २००० फिक्स डिपॉझिटमध्ये गुंतवून प्रथम व द्वितीय क्रमांकांच्या बक्षिसांची व्यवस्थाही केली

या स्पर्धांचे हे पहिलेच वर्ष असले तरी महाराष्ट्रातील महाविद्यालयांकडून बराच प्रतिसाद मिळाला. सातारा, पुणे, मुंबई, रत्नागिरी, नासिक, जामनेर, सासवड, अमरावती, नागपूर, औरंगाबाद, जयसिंगपूर व बारामती येथील एकूण वीस स्पर्धकांनी वाद स्पर्धेत व चोवीस स्पर्धकांनी वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला होता. या स्पर्धा दि. १३ जाने. १९७४ रोजी आमच्या महाविद्यालयात भरविण्यात आल्या. मा. श्री. जे. पी. बुधवंत, प्रांत ऑफिसर बारामती ह्यांनी स्पर्धांचे उद्घाटन केले. सकाळच्या वादस्पर्धांचे सूत्रसंचालन प्रा. डॉ सुर्वे ह्यांनी व दुपारच्या वक्तृत्व स्पर्धांचे सूत्रसंचालन श्री. कमलाकांत ढवाण–पाटील ह्यांनी केले. परीक्षक म्हणून पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजचे राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. वि. मा. बाचल, बारामती येथील ख्यातनाम वकील श्री द. स करंदीकर व मुधोजी कॉलेज, फलटण येथील मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. ह. बा. कुलकर्णी हे लाभले होते.

दोन्ही स्पर्धा अत्यंत चुरशीच्या झाल्या. मुंबईच्या आर. ए. पोदार मेडिकल कॉलेजच्या श्री. सुभाष गोविंदराव आफळे श्री. जीवन अविनाश मोहाडीकर ह्या विद्यार्थ्यांनी संघाच्या गुणानुक्रमाने प्रथम क्रमांक मिळवून वादस्पर्धेसाठी असलेली ढाल जिंकली व त्याच कॉलेजच्या श्री. सुभाष गोविंदराव आफळे ह्यांनी वक्तृत्वाची ढाल वैयक्तिक प्रथम क्रमांकाच्या गुणाधिक्याने जिंकली. याउलट सर्वाधिक रोख बक्षिसे पटकावण्याचा मान औरंगाबाद येथील आंबेडकर लॉ कॉलेजचे विद्यार्थी श्री. विनायक किशनराव चौधरी ह्यांना मिळाले.

ह्या स्पर्धांसाठी बारामतीतील प्रतिष्ठितांनी वैयक्तिक बक्षिसे स्पर्धांचे आयोजन झाले, त्याचवेळी जाहीर केली होती. त्यांचे वितरण पुढीलप्रमाणे झाले–

**वादासाठी**

१) श्री. वि. रं. गुजर ह्यांनी ठेवलेले प्रथम क्रमांकाचे बक्षिस रुपये एकशे एक मात्र श्री. विनायक किशनराव चौधरी (औरंगाबाद) ह्यांना मिळाले.

२) सौ. मृणालिनी मोतीलाल शहा ह्यांनी ठेवलेले द्वितीय क्रमांकाचे बक्षिस रु. एक्कावन्न मात्र श्री. विजय बसंत भिडे ( र. प. गोगटे कॉलेज, रत्नागिरी ) ह्यांनी मिळविले.

**वक्तृत्वासाठी**

१) वक्तृत्व स्पर्धेत गुणानुक्रमाने प्रथम क्रमांक मिळविणारे श्री. सुभाष गोविंदराव आफळे ( मुंबई ) यांना श्री. श्रीपाल छगनलाल मुथा यांनी जाहीर केलेले रु. एकशे एक मात्रचे बक्षिस मिळाले.

२ वक्तृत्व स्पर्धेत गुणानुक्रमाने द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्यास श्री. मोतीचंद फुलचंद शहा (मुंबईकर) ह्यांनी देऊ केलेले रु. एक्कावन्न चे बक्षिस श्री. जीवन अविनाश मोहाडीकर ह्यांना देण्यात आले.

३) खास मोरोपंतांवरील विषयावर बोलणाऱ्यांपैकी श्री. विनायक केशवराव चौधरी ह्यांना श्री. खुशालचंद रतनचंद छाजेड ह्यांनी जाहीर केलेले रु. एकशे एक मात्र चे बक्षिस देण्यात आले.

ह्या पूर्व निर्धारित पारितोषिकांव्यतिरिक्त उत्स्फूर्त अशी काही बक्षिसे ऐन वेळी देण्यात आली. सौ पद्माताई करंदीकर ह्यांनी सर्व स्त्री–स्पर्धकांना मिळून रु. पन्नास ची रोख बक्षिसे दिली; तर श्री. द. स. करंदीकर, वकील ह्यांनी श्री. विनायक चौधरी ह्यांना रु वीस चे रोख बक्षिस दिले, तालुका पंचायत सदस्य श्री. कमलाकांत ढवाण–पाटील ह्यांनी मोरोपंतांवरील विषयावर भाषण देणाऱ्या कु. संजीवनी साठे (बारामती) हीस एक्कावन्न रु. चे व श्री. नारायण खटके ह्यांना पंचवीस रुपयांचे अशी रोख बक्षिसे दिली; तर श्री. श्रीपाल मुथा, उपनगराध्यक्ष, ह्यांनी कु. ज्योत्स्ना जितमल छाजेड (नासिक) हीस पंचवीस रु. चे रोख बक्षिस दिले.

ही सर्व बक्षिसे व ढाली त्याचदिवशी स्पर्धा संपल्यानंतर सौ. स्मीताताई गुजर ह्यांचे शुभहस्ते वितरित करण्यात आल्या. ह्या प्रसंगी मा वि. रं. गुजर नगराध्यक्ष. बारामती नगर परिषद ह्यांनी अध्यक्षपद भूषविले होते. बारामतीतील विविध थरातील प्रतिष्ठित नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी स्पर्धांना उपस्थित राहून स्पर्धकांना प्रोत्साहन दिले यंदा स्पर्धेस मिळालेले यश पाहता पुढील काही वर्षातच स्पर्धा चांगल्याच नांवारूपाला येतील ह्याची खात्री वाटते.

स्पर्धांच्या यशात आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी–प्रतिनिधी व विद्यार्थी ह्यांनी केलेले बहुमूल्य साह्य व मार्गदर्शन ह्यांचा वाटा नि:संशय फार मोठा आहे.

सर्वांचे हार्दिक आभार

**प्रा. डॉ. कृ. मं. सुर्वे**
कार्याध्यक्ष
कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन
वाद व वक्तृत्व स्पर्धा

---

# मोरोपंतांचे कवित्व

मोरोपंतांचे कवित्व केवळ द्राक्षपाकाच्याच वर्गात येणार नाही. साऱ्या महाराष्ट्र कवीत त्यांचे काव्य समजण्यास अंमळ श्रम लागतील खरे, तरी जो बहुश्रुत आहे, म्हणजे ज्यास संस्कृत शब्द बरेच माहीत असून समाजाची मोडणी समजली आहे; आणि प्रस्तुत कवीची पद्धती ज्यास थोडीशी ठाऊक झाली आहे, त्यास म्हणजे हरएक आर्येशी अर्थबोध होण्याकरितां थबकून रहावे लागेल असे मुळीच नाही. बहुतेक आर्या त्यास वाचता, वाचता सहज उलगडतील. क्वचित् ठिकाणी मात्र कि जेथे यमकामुळे, प्रासामुळे वगैरे वाक्याची रचना अंमळ अव्यवस्थित झाली असेल, तेथे थोडासा विचार करावा लागेल; तरी ज्याप्रमाणे सूर्याच्या आढ आलेला ढग त्याच्या बिंबावरून निघाला असता अंधार जाऊन एकदम चक्क होते किंवा धुराचा भफकारा वर निघून जाऊन अग्नीची ज्वाला प्रगट होते; त्याप्रमाणे वरील ठिकाणी एकदम अर्थव्यक्ति झाली असता मनास चमत्कार व आल्हाद होतो !

'मोरोपंतांची कविता'
'निबंधमाला'
**विष्णुशास्त्री चिपळूणकर**
पृष्ठ ८८६

# पटेल हिरालाल गोविंद सॉ मिल

## टिंबर मर्चन्ट अॅण्ड फर्निचर वर्क्स

गुनवडी रोड, बारामती - जि. पुणे

☎ ३८२

-: आमच्याकडे :-

इमारतीस लागणारे सागवानी कापीव लाकूड

सागवानी गोलटे, बल्लीस

लालटेक, जव्हारटेक इ. जंगलवूड व

ऑर्डरीनुसार फर्निचर्स

योग्य दरांत खात्रीशीर मिळेल.




### जन्मशताब्दीनिमित्त

# आदरांजली

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना अभिवादन--**

महर्षी वि. रा. शिंदे हे महाराष्ट्रातील थोर विचारवंत व समाज सुधारक होते. नवमहा–
राष्ट्राच्या निर्मितीत त्यांचा फार मोठा वाटा आहे. त्यांची जन्मशताब्दी महाराष्ट्रभर साजरी होत
आहे आजच्या काळात त्यांची स्मृती जागविणे आणि समाज प्रबोधनाच्या दृष्टीने महाराष्ट्रीय
समाज एकात्म करण्याची अत्यंत निकड आहे.

महर्षी शिंदे यांच्या स्मृतीला आमचे नम्र अभिवादन !

**राजकवि भा. रा. तांबे यांची जन्मशताब्दी–**

मराठी काव्यात आपल्या प्रसन्न आणि नादमधुर भावकाव्याने मराठी रसिकांना लुब्ध कर
णारे राजकवि भा. रा. तांबे यांची जन्मशताब्दी महाराष्ट्रात साजरी होत आहे. त्यांच्या मधुघट,
मरणात खरोखर जग जगते, रुद्रास आवाहन, जन पळभर म्हणतील हाय हाय, सहज तुझी
हालचाल, नववधू प्रिया... आदि भावकविता प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्राबाहेर ग्वाल्हेर येथे
राहूनही त्यांच्या काव्याने मराठी मने जिंकली. मराठी कवितेला त्यांनी दिलेले भावकवितेचे
लेणे ही त्यांची खास देणगी होय.

त्यांच्या स्मृतीला आमचे विनम्र अभिवादन !

**स्वातंत्र्य शाहिरांना आदरांजली–**

गोविंद त्रिंबक तथा आबा दरेकर हे कवी गोविंदांचे नाव. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या
सहवासात कवि गोविंद स्वातंत्र्याचे शाहीर बनले. घरची गरीबी आणि रोगाने शरीराला प्राप्त
झालेला कायमचा पंगुपणा असे असतांनाही त्यांची प्रतिभा आणि सत्यशील बुद्धी सतेज राहिली.
त्यांचे काव्य म्हणजे उज्ज्वल, उदात्त व गंभीर भावनाविष्कार होता. लोकमान्य
टिळकांवरील कवितात त्यांची भावना व्यक्त झाली आहे.

‘ मुक्या मनाने किती उधळावे शब्दांचे बुडबुडे
तुझे पवाडे गातील पुढती तोफांचे चौघडे ’

असे लोकमान्यांचे वर्णन करणाऱ्या कवीला त्याने केलेले हे काव्य तंतोतंत लागू पडते.

कवी गोविंदांना आमची भावपूर्ण आदरांजली.

# श्रद्धांजली

गेल्या वर्षभरात आपल्या महाराष्ट्रातील अनेक नामवंत साहित्यिकांना, देशभक्तांना आणि संशोधकांना आपण मुकलो आहोत.

महाराष्ट्रातील आणि देशातील अनेक नामवंत व्यक्तींचे जीवन अनंतात विलीन झाले आहे. या नर–रत्नांना कठोर नियतीने आपल्यापासून हिरावून नेले आहे.

मध्यमवर्गीय समाजाची जीवनचित्रे रेखाटणारे श्री. वि. वि बोकील, मराठी लघुकथेचे शिल्पकार दिवाकर कृष्ण, मराठीतील उदारमतवादी टीकाकार दि. के. बेडेकर, 'महाराष्ट्राचे महामंथन' या ग्रंथाचे लेखक व प्रसिद्ध कामगार नेते लालजी पेंडसे, केन्द्रीय कायदा, न्याय, व कंपनी व्यवहार खात्याचे राज्य मंत्री आनंदराव चव्हाण, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंचालक गोळवलकर गुरुजी, गोव्याचे मुख्यमंत्री श्री. भाऊसाहेब बांदोडकर, प्रबोधनकार ठाकरे, प्रसिद्ध मराठी संशोधक अ. का. प्रियोळकर, कवि गिरीश, के. नारायण काळे, प्रभातकार श्री. वालचंद कोठारी, केन्द्रीय मंत्री मोहन कुमार मंगलम् आणि माजी केन्द्रीय अर्थमंत्री श्री. टी. टी. कृष्णम्माचारी, प्रसिद्ध शास्त्रज्ञ श्री. सत्येन बोस, अभिनयकुशल श्री. बलराज साहनी, दलित सेवक श्री. वि. नि. उपाध्ये, डॉ. वि. पां. दांडेकर या मान्यवरांना देश मुकला आहे.

या सर्वांना आमची भावपूर्ण श्रद्धांजली !

## आमचा विद्यार्थी



कुमार सुवीर गायकवाड

आमच्या महाविद्यालयातील एफ्. वाय्. बी. ए. च्या वर्गातील विद्यार्थी कु. सुवीर मल्हारराव गायकवाड हा रविवार दिनांक २४।२।७४ रोजी अकल्पित देवाघरी गेला त्याच्या अकाली निधनाने त्याच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला. सुवीर हा नम्र, हुशार आणि मनमिळावू विद्यार्थी होता. त्याच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. आम्ही सर्व त्याच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो !



# माझे मनोगत !

विद्यार्थी बंधु भगिनींनो–

आपल्या महाविद्यालयाचा हा बारावा अंक आपणा सर्वांच्या हाती देताना मला अतिशय आनंद होत आहे.

सध्याची आपल्या देशाची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. महागाई आणि टंचाई यांच्या युगात आपण वावरत आहोत. महागाईच्या दुष्टचक्रातून अजूनही आपण मुक्त झालो नाहीत. अशा परिस्थितीत कागदाची दुर्मिळता आणि मुद्रण साहित्याची महर्गता लक्षात घेतली म्हणजे हा अंक काढणे मोठे अवघड काम होते. परंतु गेल्या अकरा वर्षांच्या परंपरेत खंड पडू नये म्हणून नेहमीप्रमाणे नियतकालिक प्रसिद्ध करायचे आम्ही ठरविले आणि अत्यंत सुटसुटीत असा अंक आज आम्ही प्रसिद्ध करीत आहोत.

नियतकालिकात प्रसिद्धीसाठी विद्यार्थी बंधु भगिनींनी विपुल साहित्य आम्हास दिले, परंतु त्यातील अगदी निवडकच साहित्य आम्ही प्रसिद्ध केले. याची जाणीव आम्हाला आहे. परंतु मर्यादित जागेत सर्वांनाच स्थान देणे कठीण असते याची जाणीव सर्वांनाच आहे.

या छोटचा अंकात जे लेख व कथा निवडण्यात आल्या आहेत, ज्या कविता प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत, हे साहित्य वाचून वाचक निश्चितच संतुष्ट होतील असे वाटते. वैचारिकतेबरोबरच मनोरंजनाचा भागही आम्ही साधला आहे. ह्या अंकाच्या निर्मितीसाठी प्रा. दयाराम पाटील यांनी खूपच मेहनत घेतली. व त्यांना प्रा. बी. बी. पाटील, प्रा. चाफेकर, प्रा. नवाथे, प्रा. डॉ. सुर्वे, प्रा. डॉ. पुराणिक, प्रा. उपाध्ये, प्रा. जे. बी. मगदूम, प्रा. वकील, प्रा. लोंढे यांनी सर्व प्रकारचे सहाय्य केले.

प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांचेही बहुमोल मार्गदर्शन आम्हास मिळाले. जनरल सेक्रेटरी श्री नंदकुमार निकम यांचेही मौलिक सहाय्य मला मिळाले सर्वच विद्यार्थी प्रतिनिधींनी मला सर्व प्रकारचे सहाय्य केले. विद्यार्थी बंधु–भगिनींनी मला नियतकालिक विभागासाठी निवडून देऊन माझ्यावर जो विश्वास दाखविला त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

व्ही. एस्. भोसले
मॅगेझिन सेक्रेटरी



## निरा कॅनॉल्स सोसायटचांचा सहकारी खरेदी विक्री संघ लि., बारामती

फोन नं.
बारामती– ३३९

(स्थापना १९२६)
वर्ग 'अ'

फोन नं.
निरा शाखा ४०

**निरा डाव्या कालव्या खालील परिसराचे आशास्थान**

| | |
|---|---|
| भाग भांडवल | रु. १०,०२,६०० |
| गंगाजळी | रु. ९,७८,००० |
| इतर निधी | रु. ४,८५,००० |
| ठेवी | रु. ६,१६,००० |

**संघाची वैशिष्टचे**

१) सर्वोदय मिश्र खताचे उत्पादक
२) जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी
३) एकाधिकार खरेदी योजनेखाली महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन लि; मुंबईचे सब् एजंट

★ विविध विभागाद्वारे शेतकऱ्यांची सेवा सतत चालू ★

मा. गुलाबराव मारूतराव रणवरे
मॅनेजिंग डायरेक्टर

मा. मुगुटराव साहेबराव काकडे (देशमुख)
चेअरमन

## स्वस्तिक टी कार्पोरेशन

स्टेशन रोड, बारामती.
येथे सर्व प्रकारचा उत्तम सी. टी. सी. चहा मिळेल.

**स्वस्तिक टी कार्पोरेशनचा चहा**
★ **नेहमी वापरा.** ★

With best compliments from—

## ANMOL PRAKASHAN

647, Budhwar Peth.
**POONA-2**







## आमचा स्वाभिमान, आमची प्रतिष्ठा !

जनरल सेक्रेटरी



श्री. नंदकुमार निकम

नियतकालिक सेक्रेटरी



श्री. व्ही. एस्. भोसले

**प्राचार्यांच्या समवेत विद्यार्थी–प्रतिनिधी**



पहिली रांग– (डावीकडून) कु. कमल देवकाते, श्री. वाय्. आर्. दामोदरे, श्री एन्. एस्. निकम, प्राचार्य डॉ. गोधा, श्री. व्ही. एस्. भोसले, कु. संध्या उपाध्ये.
मागे (डावीकडून) – श्री. एस्. आर्. मठ, श्री. ए, एच्. बागवान, श्री. एस्. एम्. जमदाडे, श्री. एम्. डी. बांदल


## मार्च १९७३ च्या विद्यापीठ परीक्षेतील उज्ज्वल यशाचे मानकरी

### ( प्री - प्रोफेशनल मध्ये प्रथम श्रेणी )


यु. जी. अजोतिकर



ए. आर्. देशपांडे



बी. व्ही. लकडे


आर्. एस्. वालेकर


कु. संध्या शहा


एच्. बी. बोराटे


ए. व्ही. निरगुडकर



ए. एम्. जाधव


व्ही. एन्. जाधव

## मार्च १९७३ च्या विद्यापीठ परीक्षेतील उज्ज्वल यशाचे मानकरी

### ( बी. एस्सी. मध्ये प्रथम श्रेणी )


एम्. एस्. बोराटे



एच् एस्. तांबे


एन्. एस्. चोपडे


सी. बी. खानावरे


पी. व्ही. कुलकर्णी


ए. जी. पवार


एस्. आर्. रायकर


बी. एस्. यादव


आर्. एम्. मुथा

( बी. एस्सी. मध्ये प्रथम श्रेणी - पुढे चालू )



एम्. टा. खकाटे



ए. आर्. देवकाते



एम्. एन्. दरेकर



स. एस्. भोसले



ए. एल्. लोंढे

पुणे येथील 'एकता' मासिकाने आयोजित केलेल्या "हे युवक देशाचा काय इतिहास घडवितील ?" या विषयावरील निबंध स्पर्धेत रु. १०० चे प्रथम पारितोषिक मिळाले.



अभिनव भारत मंदिर नासिक या संस्थच्यावतीने कवि गोविंद जन्म शताद्विनिमित्त घेतलेल्या निबंध स्पर्धेत ७५ रुपयाचे पारितोषिक मिळाले.

कु. रेखा भागवत

महाविद्यालयाच्या नियोजित इमारतीचे

# भूमिपूजन

( दि. २ सप्टेंबर १९७३ )



← मा. श्री. शरद्चंद्र पवार व सौ. प्रतिभाताई पवार–भूमिपूजन करताना



श्री. माणिकलाल शहा (वाघोलीकर) → स्वागत करताना



← सौ नलिनीबाई शहा- ५००० रुपयांचा चेक देताना.



श्री. विनोदकुमार गुजर →

(11)

विविध कार्यक्रम

# वर्धापन दिन



डॉ. कोठारी - कुलगुरु महाजनींचा सत्कार करताना




-- डॉ. महाजनी --



म. गांधी जयंती – श्री. एस्. एम्. जोशी




म फुले पुण्यतिथी- प्राचार्य बॅ. पी. जी. पाटील




लो. टिळक पुण्यतिथी -- डॉ. सुधाकर भोसले

कविवर्य मोरोपंत आंतर महाविद्यालयीन

# वाद व वक्तृत्व स्पर्धा

(दि. १३ जानेवारी १९७४)



← प्राचार्य डॉ. गोधा नगराध्यक्ष श्री. वि. रं. गुजर हयांचेकडून ढालीचा स्वीकार करीत असताना



उद्घाटक प्रांत ऑफिसर श्री. बुधवंत हयांचा → सत्कार करताना श्री. निकम



← श्री. स्मीताबाई गुजर हयांचे हस्ते पारितोषिक स्वीकारताना श्री. विनायक चौधरी (लॉ कॉलेज, औरंगाबाद)




वादस्पर्धेतील विजेता संघ (श्री. आफळे व → श्री मोहाडीकर, पोदार मेडिकल कॉलेज, मुंबई) ढालीचा स्वीकार करताना

# दक्षिण भारत सहल


१ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर १९७३



म्हैसूर– चामुंडी हिलवर



समर पॅलेस– श्रीरंगपट्टम्



श्री रंगनाथ मंदिराचे प्रथमद्वार
(त्रिचनापल्ली)



जगमोहन पॅलेस श्रीरंगपट्टम्

# विविध गुणदर्शन



← ' आळीमिळी गुपचिळी ' मधील एक दृश्य ....


चंद्रकांत– हा घे नेकलेस तुझ्या मनोनिग्रहाबद्दल .... →
(आळीमिळी गुपचिळी)





← भांगडा नृत्य

आर्केस्ट्रा →



# विविध–गुण–दर्शन



← " Antonio : Grieve not that I'm fallen to this for you "

( The Merchant of Venice )




" Portia : It droppeth as gentle rain from heaven, upon the place beneath " →

( The Merchant of Venice )



← मुलगा– बिस्किटं छान आहेत हं ! (झुलता पूल)



'झुलता पूल' मधील आणखी एक दृश्य →

# मराठी विभाग

## साहित्याचे कार्य-

" मानवी स्वभावाचे मर्म शोधीत शोधीत वाचकाला सत्याकडे
नेणे हे साहित्याचे काम. हे सत्यहि कलात्मक सत्य असते. (साहित्य–
काराला भासलेले सत्य असते). अंतिम सत्य नव्हे. अशा सत्याच्या
दर्शनाने साहित्याच्या आस्वादकाला एक आनंद होतो. त्याच्या मनाचे
उन्नयन होते. साहित्याच्या निर्मितीने त्याच्या निर्मात्याला एक अना–
मिक आनंद होतोच, पण वाचकालाही एक शुद्ध आनंद मिळावा
लागतो. अशा शुद्धानंदाचे दान करणारे साहित्य हे माझ्या मते चांगले
साहित्य. वाचकाचे जे केवळ मनोरंजन करते त्या साहित्याला मी
गौण म्हणेन आणि जे साहित्य वाचकाच्या मनाची पातळी आहे
त्याच्या खाली आणते ते हीन साहित्य."

"प्रसाद नांवाचां गुण कवितेच्या क्षेत्रातून पूर्णपणे अंतर्धान होतो
की काय असे वाटू लागले आहे. छंदोबद्धता तर केव्हाच लोपली आहे.
लयीचा बडिवारहि कोणाला राहिलेला नाही. अर्वाच्य शब्दांच्या
उपयोगाबाबत एक दुसऱ्यावर ताण करतो आहे. सारीच कविता एका
छापाची झाली आहे. परंपरागत कवितेला बाजूला सारून अट्टाहासाने
पुढे येणारी कविता अशी आहे, हमरंगी. तिचे नवेपण फार लौकर
जुने झाले असेच म्हणावे लागेल. या नव्या कवितेकडेहि सहानुभूतीने
पाहिले पाहिजे, ही गोष्ट खरी आहे. पण तसे पाहण्याचा प्रयत्नही
निराशाजनक ठरतो. नवकवितेतला दुर्बोधतेचा विशेष या अभिनव
कवितेने आणखी मोठ्या प्रमाणावर आत्मसात केला आहे."

**ग. दि. माडगूळकर**

यवतमाळ साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणातून–

# शिक्षणाचे ध्येय–

शिक्षणातून संस्कारित झालेली नवी पिढी सर्व अर्थांनी स्वतःच्या पायावर उभी राहणारी पाहिजे. शिक्षण संपताच प्रामाणिकपणे व कार्यक्षमतेने अर्थोत्पादन करण्याची संधी प्रत्येकास उपलब्ध झाली पाहिजे. विनारोजगार रिकामा राहणारा तरुण म्हणजे मानवी संपत्तीचा दुरुपयोग होय. देशाच्या आर्थिक विकासासाठी कोणकोणत्या क्षेत्रात किती प्रकारचे व किती लोक केव्हा लागणार आहेत, या संबंधीचे नियोजन–म्हणजेच मनुष्यबळाचे नियोजन-व्यवस्थित करून त्याप्रमाणे डॉक्टर्स, स्थापत्यविशारद, वकील, तंत्रज्ञ, कुशल कामगार इत्यादी लोक किती लागणार आहेत, हे ठरविता आल्यास त्याप्रमाणे तितके लोक तयार करणाऱ्या संस्था व तितकी सुविधा निर्माण झाली पाहिजे. शेतकरी, सैनिक व कामगार यांची संख्याही अजमाविता येईल. या विविध क्षेत्रांतील कामाकरिता कोणत्या प्रकारची पात्रता व विद्या लागेल व ती संपादन करण्याकरिता कोणत्या प्रकारचे तात्त्विक व पुस्तकी शिक्षण आणि कोणत्या प्रकारचे प्रात्यक्षिक शिक्षण लागेल, याची सर्वोच्च पातळीवरून आखणी करता येईल. अन्यथा, आज ज्या प्रकारच्या कामाला मागणी आहे, उदाहरणार्थ टंकलेखक, लघुलिपीलेखक, तंत्रज्ञ, डॉक्टर्स त्या कामाला पुरेशी माणसे मिळत नाहीत, अशी परिस्थिती सदैवच राहील.

राष्ट्रीय आणि सामाजिक जबाबदाऱ्या ओळखून त्या नीट पार पाडणाऱ्या तरुणांची फळी शिक्षणसंस्थांनी तयार केली पाहिजे. या दृष्टीने नियोजित विषयातील ज्ञानाखेरीज चारित्र्यसंपन्न होईल अशा गुणांची जोपासना करणारे संस्कार शैक्षणिक संस्थानी विद्यार्थ्यांवर केले पाहिजेत. आळस टाकून उद्योगाची कास धरणारे महत्वाकांक्षी तरूण विद्यापीठातून बाहेर पडले पाहिजत. नवे तरूण सुदृढ शरीर प्रकृतीचे आणि त्याचबरोबर सुदृढ मनाचेही असले पाहिजेत. सभोवतालच्या जगातील बदलत जाणाऱ्या तांत्रिक, राजकीय व सामाजिक शक्तींचा आपल्यावर व आपल्या देशावर काय परिणाम होईल हे त्यांना ओळखता येण्याची नवी दृष्टी निर्माण झाली पाहिजे.

या दृष्टीने आजच्या शैक्षणिक संस्थांनी अजून खूपच काहीतरी करावयास हवे आहे.

–डॉ. प्र. चिं. शेजवलकर
प्रसाद जानेवारी १९७४ पृष्ठ ५३



# काव्यसुमने

## एवढे करू नकोस

गीत जरी लिहीलेस तू
अमर गीत लिहू नकोस
अमरगीत जरी लिहिलेस तू
माझ्यासाठी लिहू नकोस
कादंबरी जरी लिहिशील तू
कटु प्रसंग लिहू नकोस
कटु प्रसंग जरी लिहिलेस तू
साज त्याला घालू नकोस
वृक्ष जरी झालास तू
वेल मला करू नकोस
वेल जरी केलीस मला तू
वृक्षावरी चढवू नकोस
मनोराज्ये जरी केलीस तू
राजा तू होऊ नकोस
राजा जरी झालास तू
राणी मला करू नकोस
मजवरी जरी रागवलास तू
खरा राग आणू नकोस
खरंच जरी रागवलास तू
सोडुनी मला जाऊ नकोस

**तानाजी जरे**
एस्. वाय्. बी. ए.

## वेडा रे !

छेडता तार काळजाची
सूर तुझेच निघती
होऊनी धुंद गातो गाणी
बोल तुझेच असती

माळावरचीच वाट
पाऊले चालती
झाडाच्या तळी, तळ्याच्या काठी,
पहुडता सुखासनी
घेत विश्रांती,

ज्ञाताच्या पलीकडे
डोळे तुला शोधती . . .
वेडा रे मी !
असतो तुझ्याच संगती
माझे हात असतात
तुझ्याच हाती . . .

**सातव एस्. एन्.**
टी. वाय्. बी. एस्सी.

## सौंदर्य

सौंदर्याचा पुरस्कार
आणतो जीवनात बहार
क्षणात जर खुडली पाकळी
तर उदास भासते कळी
टिचकी मारता दवबिंदूस
नाजुकता होते खलास
पंख तुटता फुलपाखराचे
तर स्वातंत्र्यच गमावते
रम्य पिसाराच नसता तर मोर
कधीच भासला नसता थोर

**कु रजनी दाते**
टी. वाय्. बी. ए.

## जीवनप्रवाह

मी तुजसाठी, तू मजसाठी
ही रीत असे जगण्यासाठी ।।धृ.।।
  कसे काय जहाले या रीतीला, हे न कळे
  तुझे माझे जीवन असे वेगळे
एक मार्ग दुसऱ्या मार्गाहूनि वेगळा
तुझ्या—माझ्या जीवनाचा खेळहा निरांळा
  उर दाटोनी येतो त्या स्मृतीनी
  केले दूर जरी आपणा, नियतीनी
काय म्हणावे अशा या नियतीला
असा आपुला जीवनप्रवाह येथेचि संपला

**प्रकाश होळकर**
पी. डी. आर्टस्

## त्रिशंकु

सदासर्वदा, घरी दारी,
अपमान सोसतो आहे,
त्रिकाळ फिरत राहतो आहे,
शोधार्थ नोकरीच्या
जेथे जातो तेथे
कपाळी आठ्या पाहतो,
तरीही लाचारी पत्करतो,
अन्
निराश होऊन परततो
विचार करीत
हातातील प्रमाणपत्रांच्या गठ्ठ्यांचा,
आणि फक्कडसा वशिला गाठायचा ।।

**कु प्रभा देशपांडे**
एम्. ए. द्वितीय वर्ष

## सारीपाट

सुखदुःखाच्या वाटेवर
होती जववरी तुझी साथ
सामोरे जात होतो
घेऊनी हातात हात
केली सर्व क्षणांवर मात
पण
तुलाही फुटली एक वाट
मला न सापडली तुझी कधी आडवाट
जीवनमार्गात सापडली नगरे आटपाट
पण मन नाही विसरत
जीवनाचा चुकलेला सारीपाट

**दत्ता महाडिक**
एफ्. वाय्. बी. ए.



## समर्पण

मीरे तू खरंच महान
हरवलेस कृष्णाच्या भक्तीत अपुले ध्यान
नव्हता कृष्ण, नव्हती बासरी ।
परंतु सतत तुझ्या डोळापुढे
ती तेजोमय शामल मूर्ती हासरी ।
फसव्या जगाने ठरविले तुला वेडे ।
परंतु कसे कळावे त्यांना—
प्रीतीचे तुझ्याभोवती दरवळले होते केवडे
तूच त्याची मधुर बासरी ।
तूच त्याची प्रिया हासरी ।
प्रत्यक्षात न आलिंगले
न भेटला तुला हरी
म्हणोत सारे जग कन्हैयाचीं आवडती
राधा खरी
मी तर मानते तुलाच प्रियाची प्रणयिनी खरी
वाजते कन्हैयाची बासरी वृंदावनी ।
छुमछुम तुझ्या पैंजणाची घुमते कानी ।
त्यजिले वैभव त्यजला राणा ।
तुला तर हवा होता कान्हा ।
आळविलेस तू एकरूप भक्तीने ।
उभा ठाकला मागे कृष्ण शक्तीने
कृपेचे त्याने तुलाच दिले विशाल दान ।
मीरे तू खरंच महान ।

**कु. कमल देवकाते**
टी वाय्. बी. ए.

## उन्मेष

नाजुकसा घ्यावा साज
  मुग्ध हास्य पांघरून ।।
मृदु संथ लहरीत
  झोके घ्यावे या पानांनी ।
हुंदडावे फुलातुनी
  स्वैर फुलपाखरांनी ।।
परी वाटते लहान
  आज सृष्टीचे अंगण ।।
नको चंद्र सूर्य आता
  थिटे सारे तारांगण ।।
आसुसल्या नजरेला
  आड क्षितिजाची मेघ ।
अंकुरल्या अंतराचे
  आहे पुढले पाऊल ।।
उसळलेल्या उन्मेषाला
  कुठे बंध कुठे हद्द ।
अंतरात खिळलेली
  विश्व विजयाची जिद्द ।।

**कुलकर्णी एल्. व्ही.**
पी. डी. आर्टस्

# आठवण

दिवस संपत आहेत;
काम तसेच पडून आहे
काय करावे ते सुचत नाही
मन वेडे झालेले आहे

कोणासाठी ते माहित नाही
श्वासातासाला आठवण येते
कामाची का आणखी कोणाची
ते अजुनही कळत नाही
तरींसुद्धा दिवस संपत आहेत
दिवस संपणारच आहेत
हे माहित असुनसुद्धा
काम काही होत नाही
आठवण काही संपत नाही
याचा इलाज काही कळत नाही
विचाराअंती इलाज एकच दिसतो
काम झटपट करून टाकणे
मन अगदी निर्मळ ठेवणे
पण काय हो तरीसुद्धा
ती येइलच ना ? आठवण हं !

**सुनील भालेराव**
पी. डी. आर्टस्



# विसावा

चालुन चालुन थकलोय
इतका चाललोय
शरीराला ओढ लागलीय
पैलतीराची
पण शैल तीरावरच
तुझ्यासाठी
मन शोधतंय
जागा विसाव्याची

**बोराडे जी. जेस्.**
टी. वाय्. बी एस्सी.







# हे युवक काय देशाचा इतिहास घडवतील !

**कु. रेखा भागवत**
एम् ए. (मराठी) द्वितीय वर्ष

**हे युवक काय देशाचा इतिहास घडवतील ! या विषयावर पुणे येथील 'एकता' मासिकाने युवक लेखन स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत आमचे महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. रेखा भागवत यांनी लिहिलेला निबंध प्रथम पारितोषिकास पात्र ठरला. त्यांचा हा निबंध आक्टोबर १९७३ चे 'एकता' दिवाळी अंकात प्रसिद्ध झाला आहे. हा निबंध आमच्या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यास अनुमती दिल्याबद्दल आम्ही 'एकता' मासिकाच्या संपादकांचे आभारी आहोत. – संपादक**

### आजचा तरुण–

भडक रंगाचा शर्ट, बेलबॉटम् पॅन्ट, गालापर्यंत वाढविलेले कल्ले, मानेवर रुळणारे केस, डोळयांवर झेपावणारी झुलपं, आणि तोंडात बेफिकिरी दर्शविणारे एखादे उडत्या चालीचे गीत·· घरात, रस्त्यात, महाविद्यालयात, प्रवासात कुठेही पावलोपावली दिसणारे आजच्या नवयुवकाचे हे रूप पाहिले म्हणजे मनात प्रश्नांची असंख्य वर्तुळे निर्माण होतात··· भविष्याच्या विचाराने मन भीतीने साशंक बनते खरोखरच स्वातंत्र्योत्तर कालात झपाट्यान अन्तर्बाह्य आमूलाग्र बदललेले हे युवक देशाचा इतिहास घडविणार काय ? ह्याचा थोडासा अन्तर्मुख होऊन विचार केला तर येणाऱ्या नकारात्मक उत्तराने मन निराशेने आणि काळजीने व्यग्र होऊन जाते.

आजच्या आशावादी युगात माझे हे विचार कदाचित् हास्यास्पद ठरतील, पण आजच्या स्वातत्र्यात वाढलेल्या युवकाच्या जीवनाचा सूक्ष्म छेद घेता प्रामुख्याने जाणवते ते हे की, आजचा युवक निरर्थक हेतूशून्य जीवन जगतो आहे, त्याची जीवननौका दिशाहीन आहे, तो चिवटपणे जगतो आहे, पण त्यामध्ये येणाऱ्या जीवनाला सामोरे जाणे एवढीच फक्त भावना आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील युवक स्वातंत्र्यप्राप्तीचे स्वप्न रंगवत होता–ते वास्तवात आणण्यासाठी धडपडत होता. नवनिर्मिती करावयाची, नवजीवन घडवावयाचे आहे ही प्रेरणा त्यांना उत्तेजित करत होती.

### आजची परिस्थिती

पण आजचा तरुण देशस्वातंत्र्याच्या मोकळ्या वाऱ्यात वाढला आहे गेल्या २५ वर्षात त्याच्या वाट्याला आलेल्या संघर्षाचे स्वरूप पूर्णपणे पालटले आहे, आणि त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातील ती गंभीर, भारदस्त व स्थिर जीवनदृष्टी आता पूर्णपणे बदललेली आहे. उपभोगिता, क्षणभंगुरता आणि सहजता या दृष्टिकोनातून ती आज जगाकडे पहाते आहे. साहजिकच परिस्थितीचे आवाहन आणि आव्हान पेलण्याची ताकद आजच्या तरुणांमध्ये उरलेली नाही. अशा परिस्थितीत त्यांच्याकडून कोणत्या भविष्याची अपेक्षा आपण करणार ?

### आजचे जीवन

आजच्या युवकाच्या वाट्याला आलेले जीवन गुंतागुंतीचे धावपळीचे आणि गतिमान आहे. ते वरवर दिसायला संपन्न असले तरी आत्मविकासाच्या दृष्टीने

अभावानेच प्रस्थापित करतो आहे.

सामाजिक, राजकीय, आध्यात्मिक, आदर्श निर्माण करण्याची भारतीय परंपरा फार मोठी आहे. ध्येयनिष्ठा आचारशुद्धता व विद्यासंपन्न नेतृत्व यांची आम्हाला केव्हाच उणीव भासली नाही पण आज आमच्याकडून तर ती परंपरा खंडित होणार नाही ना ही शंका मनास अस्वस्थ करते आहे. ज्यावेळी आम्हाला आमच्या वैचारिक दैन्याविरुद्ध उठाव करण्याची वेळ येईल तेव्हा गांधीजीसारखा एखादा सेनानी आम्हास लाभेल ? ज्या वेळी जगातील विद्वान एकाद्या विषयावर प्रमाणबद्ध चर्चा करतील, त्यावेळी त्याच तोलाचा उपन्यास करणारा एखादा टिळकांसारखा विद्याव्यासंगी आमच्यातून निर्माण होईल ? आज तरी या प्रश्नांची उत्तरे खेदाने नकारार्थी द्यावी लागत आहेत.

आजचा तरुण पदवीधर होऊनही बेकारच राहतो आहें. आपले दैनंदिन जीवनही तो यशस्वीपणें जगू शकत नाही. अशावेळी अपरिहार्यपणें येणाऱ्या वैफल्यातूनही तो काहीतरी नवनिर्मिती करेल ही अपेक्षाही चुकीची वाटते. शिवाय 'आम्हाला कोणी समजावूनच घेत नाही' ही त्याची तक्रारही दुर्लक्षून चालणार नाही. काही असो अशा परिस्थितीत आजचा युवक आपल्या स्वकर्तृत्वानें नवनिर्मिती घडवून आणेल या विषयी मनात शंका निर्माण होते हे निश्चित.

**समारोप–**

शेवटी 'तुका म्हणे उगी रहावे, जे जे होईल ते ते पहावे' असे म्हणून गप्प बसणें आजतरी क्रमप्राप्त आहें, पण त्याचवेळी तुकोबांचे 'बुडती हें जग न पहावे डोळा' हें उद्गार स्मरुन मन निराश होते. आजचे युवक वैफल्य सोडून जिद्द धरतील, श्रद्धायुक्त भावनेने कार्यरत राहतील तर स्व-कर्तृत्वाने देशाच्या इतिहासात स्वतःच्या पाऊल खुणा उमटवतीलही – – अशी आशा जरूर करू या ! माणसाने आशावादी जरूर असावे, पण तो आशावाद डोळस असावा एवढंच ! व्यासंगी विद्वतेचा, निष्कलंक नेतृत्वाचा व कर्तव्यनिष्ठ कर्तृत्वाचा मानदंड आजचे युवक निर्माण करतील यावर मी निदान आज तरी– विश्वास ठेवायला तयार नाही


भरघोस पिकासाठी

टाटा फायझन पेस्टिसाइडस् व रॅलीची

'झाड छाप' मिश्र खते वापरा

रॅलिच्या मिश्रखतांनी जमीनीचा कस टिकविला जातो

कमी खर्चामध्ये जास्त पीक निघते

द्राक्ष, ऊस, कापूस, धान्य, फळे, भाजीपाला वगैरे पिकांसाठी माफक किंमती

खास मिश्रखते व गुजरात फर्टिलायझरचे अमोनियम सल्फेट व युरिया



मिळण्याचे ठिकाण–

मे. छगनलाल निहालचंद मुथा

सर्व प्रकारचे बी बियाणे व किराणा मालाचे व्यापारी

बारामती – जिल्हा पुणे

फोन ३८१

सुरेंद्र ऑटोमोबाईल्स

इंडियन ऑईल कं. डिलर माळेगाव बु॥ फोन ३९




## ओढ ......


**महामुनी आर्. पी.**

एफ्. वाय्. बी. कॉम.


प्रियकराबरोबर फिरावयाला निघालेल्या आणि अंतर राखून चालणाऱ्या प्रेयसीच्या गतीनं बॉम्बे – सिकंदराबाद अेक्सप्रेस सोलापूर प्लॅटफॉर्मला लागली. तो आला, केसावरुन कंगवा फिरवला आणि फर्स्टक्लास डब्याच्या दाराजवळ येऊन उभा राहिला.

रानवाऱ्यानं गर्द राईत शीळ घालावी तशी गार्डची व्हीसल गजबजलेल्या वातावरणात विरली. स्टेशनची स्टार्टिंग बेल खणखणली आणि गार्डच्या हातातील हिरव्या बत्तीनं संथपणे मान डोलावली आणि गाडीनं हळुवारपणे प्लॅटफॉर्म सोडायला सुरवात केली.

एवढ्यात ती पळत स्टेशनात शिरली. हळूहळू गतीमान होणारी गाडी तिनं पकडली; क्षणाचाही विलंब न लावता त्यानं तिच्या हातातील सुटकेस आत भिरकावली आणि तिला वर ओढलं . . . एक दोन मिनिटं तशीच गेली असतील कदाचित . . .

ती भीतीनं थरथरत होती. सार अंग घामानं डंवरल होतं. त्याचा एक हात तिच्या नाजूक कमरेभोवती गुंफला गेला होता आणि भ्यालेल्या हरिणीसारखी ती त्याला बिलगली होती ! गुलाब पुष्पांच्या ताटव्यांनी बहरलेली गुलाबी जॉर्जेटची साडी खांद्यावरुन ढळली होती. गोल गळ्याच्या ब्लाऊजमधून तिचे उरोज भ्यालेल्या सशासारखे थरथरत होते.

काही क्षणात तिनं स्वतःला सावरलं. कमळ पुष्पांच्या पाकळ्या उघडल्या. डोळे त्याच्यावर स्थिरावले. कमळ पुष्पांच्या पाकळ्या कृतज्ञतेच्या दंवबिंदूनी भिजून गेल्या . . .

'काय एवढी अर्जन्सी होती धावती गाडी पकडायची ! ' त्यानं वैतागून म्हटलं.

ती थोडीशी हसली. 'अहो आजच माझी रजा संपते उद्या मला ड्युटी रीझ्युम करायलाच हवी. '

'एक्सटेन्शन करायचं मग. '

'उपयोग काय ? ' तिनं प्रती सवाल टाकीत काळजीच्या स्वरात म्हटलं. मुख्यमंत्र्यांनी प्रजासमाजवादी पक्षांच्या तेलंगवादी नेत्यांची धरपकड केली आहे. म्हणूनच मी आज गाडी पकडायची एवढी धडपड केली.

'करेक्ट' ह्रिच्या बोलण्याला प्रतीसाद देत तो पुढे झाला. दरवाजा बंद करुन तिच्याकडे वळून म्हणाला 'अशांना वेळीच आळा घालण बरं.'

गार वारा त्याच्या अंगाला झोंबला . . . त्या सरसी त्याच्या शरीरावर काटा उभा राहिला. जळजळणाऱ्या डोळ्यांच्या कडा पाण्यानं भरून आल्या.

तिनं ओळखलं, खरं तर तिला मघाशीच जाणीव झाली होती की, त्याच्या अंगात ताप आहे.

पण शरीर सुखाच्या स्पर्शानं तो सारं काही विसरला होता. ह्या जाणीवेनं ती सुखावली . . लाजली.

डब्यात आल्यावर तिनं त्याच्या हातावर प्रथमोपचार पेटीतील पावडर काढून ठेवली. वॉटर बॅगमधून काढलेल्या पाण्याचा ग्लास पुढं केला.

'तुम्ही नर्स आहात का ?' आणि त्यानं प्रथमोपचार पेटीवरील वळणदार अक्षरं वाचली. कृष्णमेघांच्या आगमनानं शीतळ वाऱ्याची झुळूक अंगाला झोंबून गेली.

'वर्षा ! किती सुंदर नांव आहे'

'हो' तिच्या बोलण्यानं तो सावरला.

'सिकंदराबादच्या मुख्य विभागीय रेल्वे हॉस्पिटल मध्ये मी नर्स आहे. आणि मी नेहमी ही प्रथमोपचार पेटी जवळ ठेवत असते.'

'आज काल रेल्वेवर हल्ले होतात, विद्यार्थी संप करतात, घेराव तर रोजचाच होऊन बसलाय आणि कधी कधी आपल्यासारखे ....'

तिनं वाक्य अर्धवट सोडून मिस्कीलपणे तिरप्या नजरेने त्याच्याकडे पाहिले.

त्या तिरप्या नजरेत त्यानं खोलवर कुठंतरी पाहिलं ... आपण प्रवासात भेटलेलो दोन राहगीर आपण ऋणानुबंधांनी एकत्र आलेलो. काही तासांचाच फक्त सहवास ... तो संपला म्हणजे दिशा वेगळ्या ... क्षितीजे वेगळी पण स्मृती सुमनांचा मात्र सुवास दरवळत राहणार ... फक्त.

पण माणसं सरोवरात निर्माण होणारी प्रेमाची कंपन मात्र सांगतात ... आपली ओढ सारखीच आहे. आवडी निवडी सारख्याच आहेत. आपण एकमेकांसाठीच आहोत. फक्त एकमेकांसाठीच !

गाडीचे ब्रेक्स करकचून लागले. त्यानं स्वतःला सावरलं. हवेच्या झोतानं उडणारी केसांची झुलपं सारखी केली. प्रसंगाच्या घळईत प्रेमाचं मधुगुंजन करायला गेलेलं मन परत आलं आणि तो सीट वर येऊन बसला.

समोर बसलेला पारशी गृहस्थ आता पेंगायला लागला होता. मघाशी चोंचीत चोंच घालून प्रेम व्यक्त करणाऱ्या पक्षाप्रमाण कुजबुजणारं मुस्लीम जोडपं एकमेकांच्या अंगावर रेलू लागलं होतं ... तिला थोडं अवघडल्यासारखं झालं ... डोकं त्या तरुणाच्या खांद्यावरुन काढून घेत आळोखे–पिळोखे देत एक जोरदार जांभयी दिली आणि तिच्यात त्याला 'ती' दिसली.

तिनं पुस्तक मिटलं. त्यातली नजर काढून घेतली आणि सीटवर आदळलं तिच्या धनकृती आळसाशी स्पर्धा करण्यासाठी ते वर उफाळलं आणि त्यानं तिला विचारलं

'संपलं ?'

'नाही. आळस आलाय बाई.'

'कुठलं पुस्तक आहे ?'

'राम मनोहर लोहियांचे. भारतीय फाळणीचे गुन्हेगार ?

'वाचलं आहे मी'

'कसं वाटलं तुम्हाला'

लोहियांनी नेहरुवर स्पष्ट आरोप केला आहे. गांधीजी फाळणीला जबाबदार नाहीत असं त्यांनी लिहिलं आहे. पण आचार्य अत्र्यांनी लिहिलेली प्रस्तावना फार मार्मिक आहे !'

'मला ती प्रस्तावनाच फार आवडली'

तिनं अभिप्राय दिला.

चर्चेच्या नादात गुलबर्गा आणि शहाबाद केव्हाच निघून गेलं. गाडी 'वाडी' प्लॅटफार्मवर येऊन थांबली. त्याने उठून अॅटॅची केस घेतली तिचा निरोप घेऊन गाडीतून खाली उतरला. ती खिडकीपाशी येऊन थांबली. तोही थांबला. एका अनामिक ओढीनं दोघांना बांधून टाकलं. दोघेही अबोल होते. पत्राची भाषा नव्हती येण्याचं जाण्याचं निमंत्रण नव्हतं. होती फक्त अबोल मूक–भाषा आणि बोलके डोळे !

००००


व्हरायटी स्टोअर्स

किराणा, स्टेशनरी, कटलरी व शालोपयोगी मालाचे व्यापारी

राममंदिराजवळ, बारामती




# भारतातील बेकारीचा प्रश्न–


व्ही. एस्. भोसले

टी. वाय्. बी. कॉम.


## भारतातील परिस्थिती–

भारतातील ब्रिटीश साम्राज्याच्या अस्तानंतर २५ वर्षांनी १९७२ मध्ये तयार करणेंत आलेल्या ५ व्या पंचवार्षिक योजनेच्या रुपरेषेत म्हटले आहे की, अत्यंत दारुण दारिद्र्यात जगणाऱ्या लोकांची संख्या एकूण भारतीय नागरिकांच्या दोन पंचमांश ते एकद्वितीयांशच्या दरम्यान आहे. आज आपल्या देशाचा इतर देशाच्या मानानें उदा. (अमेरिका, जपान, रशिया) विचार केला असता आपल्या देशात बेकारीचे प्रमाण जास्तच आहे.

## कारणमीमांसा–

भारतात बेकारीचे प्रमाण जास्त आहे. याची अनेक कारणें आपल्या डोळयापुढे आहेत आणि अशा प्रकारच्या कारणामध्ये महत्वाचे कारण कोणते असेल तर, ते म्हणजे भारताची वाढती लोकसख्या हे आहे. आपल्या भारताच्या लोकसंख्येच्या मानाने जमिनीच्या क्षेत्रफळाचा विचार केला तर उपलब्ध जमिनीचे क्षेत्रफळ फारच कमी आहे. आणि जे एकंदर क्षेत्रफळ आहे त्यापैकी सर्वच जमीन उत्पादनासाठी वापरली जात नाही. जी जमीन उत्पादनासाठी वापरली जात नाही उदा. डोंगराळ भाग, जंगल, वाळवंटी प्रदेश यातील जमीन निष्कारण पडून असल्यामुळे त्या ठिकाणी उत्पादन काढले जात नाही त्यामुळे त्याचाही बेकारी वाढण्याच्या कामी थोडा फार वाटा आहेच

## भांडवलाचा प्रश्न–

दुसरे कारण सांगायचे झाले तर ते भांडवलाच्या बाबतीत सांगावे लागेल भारतातील भांडवल हे लोकसख्येच्या मानाने फारच अपुरे पडते. भांडवल अपुरे असल्यामुळे त्या भांडवलाच्या साह्याने भारतातील सर्व लोकांना मजुरी किंवा काम देता येत नाही. त्यामुळे लोकांची काम करण्याची इच्छा असूनदेखील काम मिळत नाही. त्यामुळे जी बेकारी निर्माण होते अशाप्रकारच्या बेकारीला सक्तीची बेकारी म्हणतात. त्याप्रमाणें भारताला जेवढे भांडवल उभारणें शक्य आहे. आणि आहे त्या भांडवलाचा शक्य त्याच ठिकाणी वापर केला पाहिजे. पण प्रत्यक्षात तसे आढळून येत नसल्यामुळे बेकारी निर्माण होण्यास मदत होते.

## अपव्यय–

भांडवलाचा अपव्यय यालासुध्दा बेकारी निर्माण होण्याच्या कारणामध्ये स्थान आहे. खरोखर ज्या ठिकाणी भांडवल वापरण्याची गरज आहे अशा ठिकाणी भांडवल उपयोगी पडत नाही. नको त्या कारणासाठी भांडवल वापरले जाते. उदा काही कामासाठी निरनिराळ्या समित्या नेमण्यात येतात आणी त्यांचा खर्च अवाढव्य वाढतो म्हणजे त्या ठिकाणी निष्कारण भांडवलाचा अपव्यय होतो. त्यामुळे बेकारी वाढते.

**शेतीप्रधान भारत–**

भारत हा जरी शेतीप्रधान देश असला तरी काही ठराविक लोकांच्या हातात जमिनीची सत्ता आहे. त्यामुळे गरीब लोकांस किंवा भूमिहीन लोकांना काम मिळत नाही. आणि काम न मिळाल्यामुळे ते बेकार बनतात त्यासाठी जमिनीच्या बाबतीत कमाल जमीन मर्यादा घातली पाहिजे. ज्या लोकांकडे जास्त जमीन आहे त्या लोकांना कांही प्रमाणात जमीन ठेवून बाकीची जमीन गरीब व जमीन नसलेल्या लोकांना दिली पाहिजे त्यामुळे ते शेतीत काम करतील व शेतीपासून उत्पादन मिळवतील त्यामुळे निदान स्वतःला आवश्यक तेवढे तरी अन्नधान्य पिकवू शकतील त्यामुळे थोडीफार बेकारी कमी होईल.

परंतु या कमाल जमीन धारणेच्या मर्यादेवर अशी टीका केली जाते की, जर गरीब लोकांना व भूमिहीन लोकांना जमिनीचे वाटप केले तर त्यांच्या–जवळ जमिनीत वापरण्यासाठी भांडवल नसल्यामुळे ते जमिनीतून जास्त उत्पन्न काढू शकणार नाहीत त्याचप्रमाणे जमिनीचे अनेक लहान लहान तुकडे पडतील आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणावरील शेतीचे फायदे मिळणार नाहीत. त्याच प्रमाणे गरीब लोकांना जर शेती दिली तर सुरुवातीला शेती कशी करावी याचे ज्ञान नसल्यामुळे त्याचा उत्पादनावर फार मोठा परिणाम होतो व जेवढे उत्पादन निघावयास पाहिजे तेवढे उत्पादन निघू शकत नाही. श्रीमंत लोकांच्या हातात सता असल्यामुळे निदान ते मोठ्या प्रमाणात भांडवलाचा वापर करून उत्पादन तरी काढतील. त्यामुळे थोडी बेकारी कमी होईल.

**शिक्षणपद्धती–**

भारतातील शिक्षणपद्धती ही अमेरिका, जपान रशिया यांच्या मानाने फारच वेगळी आहे. भारतामध्ये तरुण पिढीला जे शिक्षण मिळते ते शिक्षण अपुरे आहे. भारतात पूर्ण ज्ञान मिळू शकत नाही. आणि त्यामुळे स्वतःच्या ज्ञानावर मोठा व्यवसाय स्थापन करता येत नाही. थोडेफार लोक वगळले असता फारच थोडे लोक उद्योगधंदे चालवितात. त्यामुळे भारत हा स्वयंपूर्ण देश राहू शकत नाही. भारताला अनक प्रकारचा कच्चा माल परदेशाहून मागवावा. लागतो. त्यामुळे भारता–तील भांडवल परदेशात रवाना होते. भारतातील शिक्षणपद्धती ही अयोग्य आहे. व म्हणून भारताची बेकारी ही बरीच वर्षे टिकून राहिली आहे.

**शेतीसुधारणा–**

भारतातील शेतकरी लहान आहेत त्यांना शेती सुधारण्याच्या बाबतीत प्रशिक्षण मिळत नाही त्याच–प्रमाणे त्यांच्यामध्ये शेतीच्या बाबतीत कुशलता नसते. त्यांच्यामध्ये एकप्रकारची दुबळी प्रवृत्ती निर्माण झाली आहे. ते जिद्दीने शेतीतून उत्पादन काढत नाहीत अशा–प्रकारची परिस्थिती ग्रामीण भागात फार मोठ्या प्रमा–णावर आढळून येते. तेथील लोकांना तेथे काम न मिळाल्यामुळे ते शहरी भागाकडे म्हणजे ज्या ठिकाणी कारखाने वगैरे आहेत अशा ठिकाणी मजुरीसाठी जातात पण त्या ठिकाणी अगोदरच मजूर कामावर असतात आणि ते जास्त अनुभवी असल्यामुळे नवीन गेलेल्या लोकांना काम मिळणे फार मुश्किल असते. त्यामुळे देखील बेकारीचे प्रमाण वाढलेले आढळून येते.

**सुशिक्षित बेकार–**

भारतातील बेकारात सुशिक्षित बेकारांची संख्या देखील वाढत चाललेली आहे. कारण भारतामध्ये कामाचे वाटप करण्याची जी पद्धती आहे ती मुळातच चुकीच्या धोरणावर आधारलेली आहे. लोकांना काम देण्याच्या बाबतीत थोड्याफार प्रमाणात वशिलेबाजी चालते. अशा प्रकारची वशिलेबाजी नष्ट केली पाहिजे कारण त्यामुळे ज लोक ठराविक काम करण्यासाठी अनुभवी व तज्ञ असतात त्यांना काम मिळत नाही आणि ज लोक काम करण्यांसाठी लायक नाहीत त्यांना काम मिळते व त्यांच्या अज्ञानामुळे उत्पादनावर त्याचा अनिष्ट परिणाम होतो व त्यामुळे उत्पादन कमी निघून बेकारी वाढण्यास मदत होते.

**उपाययोजना–**

भारतातील बेकारी ही एकदम नष्ट होणे कठीण आहे व ती नष्ट करण्याचा भारत सरकारचा बराचसा प्रयत्न चालू आहे पण त्याला अजून तितकेसे यश आले नाही प्रत्येक पंचवार्षिक योजनेत बेकारी नष्ट करण्या–साठी कांहीना काही तरी योजना आखल्या जातात व त्याची अंमलबजावणी थोड्याफार प्रमाणात यशस्वी–पणे पार पाडली जाते.

भारतातील बेकारी कमी करण्यासाठी कांही उपाय आहेत पण ते काटेकोरपणे अंमलात आणले पाहिजेत. त्याच्यातील पहिला उपाय म्हणजे भांडवल योग्य ठिकाणी वापरणे हा होय. भांडवलाचा अपव्यय होता कामा नये. आहे ते भांडवल जास्तीत जास्त कसे उपयोगी पडेल याचा विचार केला पाहिजे. त्याचप्रमाणे करापासून जे उत्पन्न मिळते त्याचा बेकारी कमी कर–ण्याच्या कामी उपयोग केला पाहिजे. त्यामुळेसुद्धा थोड्या फार प्रमाणात बेकारी कमी होईल.

भारताची जी वाढती लोकसंख्या आहे त्याला आळा घातला पाहिजे. त्यासाठी सरकारने कुटुंबनियो–जनासारख्या योजना हाती घेतल्या आहेत पण त्यात म्हणावे तितके यश आले नाही त्याचप्रमाणे आधुनिक पद्धतीने शेती केली पाहिजे म्हणजे शेतीपासून जास्तीत जास्त उत्पन्न मिळून अन्नधान्याच्या बाबतीत भारत स्वयंपूर्ण झाला पाहिजे. म्हणजे बेकारी थोडीफार तरी कमी होईल.

**नवी पिढी नवी गरज–**

आता जी तरूण पिढी शिकत आहे त्यांना योग्य व परिपूर्ण शिक्षण दिले पाहिजे तसे झाल्यास स्वतःच्या बुद्धीवर ते अनेक उद्योगधंदे निर्माण करतील आणि हजारो लोकांना काम मिळून बेकारीचा प्रश्न आटो–क्यात आणता येईल.

भारतातील लहान शेतकऱ्यांना सरकारने मदत केली पाहिजे की जेणेकरून ते शेतकरी आपली शेती सुधारतील त्यासाठी त्यांना शेतीच्या बाबतीत प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे. तसेच परदेशात माल पाठविण्यासाठी कराच्या बाबतीत सवलत दिली पाहिजे त्यामुळे त्यांना भरपूर उत्पादन काढण्यास प्रेरणा मिळेल. अशाप्रकारच्या उपाययोजना जर अंमलात आणल्या तरी देखील भारतातील बेकारी कमी होईल.

卐卐


फोन नं. २५१ घरी २५२

**मे. फकरुद्दीन सैफुद्दीन अॅन्ड कंपनी**

**पो. बॉ. नं. ३१ बारामती जि. पुणें**

दि असोसिएटेड सिमेंट कंपनी लि.

दि अल्कली अॅन्ड केमिकल कार्पोरेशन ऑफ इंडिया लि.

इमके मेक्स इंडिया लि. मुंबई

असबेस्टास सिमेंट लि. मुंबई

दि ब्रिटानिया बिस्कीट कंपनी लिमिटेड मुंबई

पॅरी कन्फेक्शनरी लिमिटेड, मद्रास

राकेट अँड कोलमन ऑफ इंडिया लिमिटेड, मुंबई

पॅको इजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड, कोल्हापूर

फोन नं. ३६९ पो. बॉ. नं. ३७

# मुंबईकर कापड दुकान

अधिकृत विक्रेते

० कॅलिको मिल्स ० अहमदाबाद ० लक्ष्मी विष्णू कॉटन मिल्स, सोलापूर
० बॉबे डाईंग ० मुंबई ० बिन्नी मिल्स मद्रास

तसेच

सर्व प्रकारचे कापड व साड्यांसाठी

## मे. मोतीचंद फुलचंद शहा (मुंबईकर)

## बारामती

M/S. SHAH POPATLAL RUPCHAND, VADUJKAR
Sulphate, Oilcake Merchant, **Baramati** (Poona)

## मे. शहा पोपटलाल रुपचंद वडूजकर

पो. बॉ. नं. १० बारामती - जि. पुणे

## बी-बियाणे व कीटकनाशक औषधे

मिश्रखताचे अधिकृत एजंट

पेंड, मिक्श्चर व सल्फेटचे व्यापारी

*

## शाखा - फलटण (सातारा)



# भटकण्यातील आनंद

किसन कुलकर्णी
एम्. कॉम. पार्ट २

"**पा**च मिनटं घरात ठरत नाही बाबा ! सारखा काही ना काही काम काढून भटकत असतो. पायाला काय भोवरा-बिवरा बांधलाय की- काय कोणास ठाउक ! " माझ्यावर वडिलांनी केलेल्या या आरोपाचं मला शुभाशुभ काहीच वाटत नाही. कारण परिस्थितीच तशी आहे; त्यामुळे वाईट वाटण्यासारखं तसं त्यात काहीच नाही. आणि खरोखरच तसं पाहयलं तर पायाला चक्र असल्यासारखं मी सतत भटकतच असतो सकाळपासून-संध्याकाळ-पर्यंत दिवसातल्या १२ तासापैकी (फक्त दोन वेळा जेवण, आंघोळ एक वेळ आणि चहा तोही सकाळी एकदाच) जेमतेम १ ते १॥ तासच माझं घरात वास्तव्य असतं. अभ्यासाला सुद्धा बाहेर मित्राच्या खोलीवर, एखाद्या सार्वजनिक (नगरपालिकेच्या) बागेत किंवा गावाबाहेरच्या गणपतीच्या देवळात असा सर्व वेळ बाहेर भटकंती होत असल्यामुळं घरच्यांनी माझ्याबद्दल वरील प्रकारचे बोलणे हयात अनपेक्षित असे काहीच नाही.

बाहेर भटकत असताना अभ्यासाच्या ओझ्याचं मला काहीच वाटत नाही. ओझं कसलं म्हणा केवळ भुसभुशीत हलकं-फुलकं एक गाठोडं. ! माझ्यासारख्या हुशार विद्यार्थ्याला (आपली आपण करी स्तुती तो एक... ? ) त्याच काहीच वाटत नाही, आणि विशेषत: कलाशाखेचा अभ्यास, साहित्य आणि रसिकता त्यात कंटाळवाण ते काय असणार ? त्यामध्ये सायन्सच्या विद्यार्थ्यांसारखं बेडूक धरुन काप, झुरळाच्या मिशा मोज, सापाचे दातच पाड इत्यादि रिकामपणाची कामगिरी नसते. तसेच कॉमर्सच्या विद्यार्थ्यांसारखं चौकोनी चेहरा करुन डोक्यातील आकड्यांची संख्या वाढतच कपाळावरील आठ्यांची संख्या वाढत नाही. त्यामुळं भटकतानाही माझा अभ्यास चालूच असतो

परमेश्वरानं म्हणे व्यक्तिचे मरण कशात असतं हे अचूकपणे हेरलेले असतं. जसं पुराणात सांगितलेल्या कथेत म्हणतात की, जटायुच मरण त्याच्या पंखात होत; तसंच माझंहि मरण माझ्या भटकण्यात आहे असंच मला वाटतं. कारण माझ फिरणं किंवा भटकणं बंद झाल तर मला मेल्याहून मेल्यासारखं वाटेल. कारण भटकण्यात जो मला एक अपूर्व आनंद मिळतो. तो केवळ शब्दाने सांगता येणार नाही भटकण्यातील आनंद काही औरच !

तापल्या तव्यासारखं चटके देणारे ऊन असो किंवा अंगाला झोंबणारा गार वारा असो किंवा वेगाने धावणारा सुसाट वारा असो, पाठीवर किंवा समोरुन तोंडावर चाबकाचे फटकारे ओढणारा पाऊस असो किंवा दातावर दात आपटताहेत आणि सारं शरीर थंडीनं गारठून जाऊन तुपासारखं आळून बसेल की काय इतपत भीती वाटणारी थंडी असो, माझं फिरणं किंवा भटकणं अशाहि परिस्थितीत चालूच असते. कधी मित्रांच्या समवेत घोळक्याने गप्पा मारीत, तर कधी एकटाच वेड्यासारखा मी दूर-दूर भटकत असतो. माझे मित्र मला घरुन निघतानाच वॉर्निंग देतात, " ए ! तू फार फार लांब जातोस बाबा फिरायला, आपण नाही

इतक्या लांब येणार, तुला जायचं असेल तर तू एकटा जा ! " मित्रांच्या या गोड तक्रारीवरुन मी ऐकटाच भटकत असतो. पावसात फिरण्यात तर फारच मजा ! नुकताच जोराचा पाऊस पडून गेला आहे, आंघोळ केलेले ओले रस्ते आणि इमारती सूर्याच्या उन्हाने अंग कोरडं करु पाहताहेत, रस्त्यावर पाणी पाणी झाले आहे. रस्त्यावरील खड्ड्यांत जागोजागी पाणी साठून राहिलंय (कारण आमची कार्यदक्ष नगरपालिका ! ) अशा वेळी मीहि एकटाच लेंगा सावरीत एक एक पाऊल दक्षतेने टाकीत असतो. पलिकडून कॉलेजमधल्या मुलींचा घोळका. घोटयापर्यंत पातळे वर करीत एकमेकींच्या खांद्यावर हात टाकीत, कुठे शेजारणीचा दंड पकडीत, सावळी पुढे सरकत असते. इतक्यात मधूनच एक फियाट आवाज देत क्षणार्धात जोरात निघून जाते आणि पोरींच्या घोळक्यातून आवाज उठतात,

"ई ऽ ऽ ऽ ई शी ऽ ऽ ऽ शी हं नॉन्सेन्स, इडियट काही मॅनर्स आहेत की नाहीत, मूर्ख लेकाचा ऽ ऽ"

'अग पण अल्के कुणाला शिव्या देतेस, कोण होतं पाहिलं का ऽ ऽ ऽ हं नाहीतर पंचाईत ऽ ऽ'

'अग आपला कॉलेज जी. एस्. अजय सोहनी होता तो !'

'अय्या ऽ ऽ अल्के, मला वाटतं म च्या सगळ्या शिव्या खोटया दिसतात !'

विरोधाभास ऽ ऽ कॉन्ट्रास्ट वगैरे बारीक-पिचके-मोठे आणि भसाड्या आवाजाचे संमिश्र स्वर कानावर पडून वातावरण बदलतं. आणि मग मीहि एक तिरपा कटाक्ष टाकून पुढे सरकतो.

अगदी गावाबाहेर असलेल्या उद्यानात येतो. सर्वत्र हिरव्यागार झिलईवर आकाशाच्या निळाईची मोहिनी पडलेली असते; आणि मनंही तिथंच रेंगाळतं बागेत प्रेमळ जोडपी कुठं लटकेच कानाशी कान लावून (बहुदा) भांडत असताना दिसतात, तर कुठं वृद्ध पती-पत्नी आयुष्याचे सांगाती होऊन कृतकृत्य झालेले असतात. त्यांचे पैलतीराकडे लागलेले डोळे कुठंतरी शून्यांत पाहात, परत विचारांच्या भोवऱ्यांत सापडलेले दिसतात. आणि ते डोळे तसेच भोवऱ्यांत फिरताना दिसतात अन् मग वाटतं इथं थांबूच नये ! पुढे कुठे लहान मुले घसरगुंडी-झोका खेळताना दिसतात. बहुधा भावी आयुष्यात आनंदाच्या हिंदोळ्यावर असताना क्षणिक सुख-दुःखाच्या येणाऱ्या क्षणांना हसतपणे सामोरे जाण्याची ही घसरगुंडी असावी, असेच वाटते. !

बागेतून बाहेर पडून मी गावाबाहेरच्या रस्त्याला येतो. आणि तसाच पुढे चालत राहतो कितीवेळ, कुठपर्यंत, कशासाठी कांहीही माहित नसते, ठरवलेले नसते. नुसता भटकत राहतो आणि बरोबर विचारही धावू लागतात. गावाबाहेर आल्यावर सर्वत्र शांतता दिसू लागते. हळू हळू रस्ता निर्मनुष्य होऊन दिवसाबरोबर तोही रेंगाळत राहतो. झाडांच्या चुकार आणि चटोर सावल्या रस्त्याच्या पायाशी तिथंच घोटाळत राहतात. मधेच कुठेतरी एखादी जुनी भव्य दगडी इमारत पारोशा स्त्री सारखी उभी असते. काही वेळेला आभाळाला गळती लागलेलीच असते. एखाद्या पांढऱ्या शुभ्र साडीवर निळे-काळे शाईचे डाग पडावेत त्याप्रमाणे आकाशांत काळे-निळे ढग जमू लागलेले दिसतात. आणि मग मीही दूर-कुठेतरी बुडणाऱ्या त्या सोन्याच्या गोळ्याचे रविराजाचे अखेरचे दर्शन डोळे भरुन घेऊन परतीच्या दिशेने पाऊल टाकतो.

आता बराच उशीर झालेला असतो. म्हणून मी झपाझपा पावलं टाकीत, रस्ता आणि इमारती मागे टाकीत घर जवळ करीत असतो. सारा गाव शांत झोपलेला दिसतो नगरपालिकेचे दिवे एखाद्या पहारेकऱ्याप्रमाणे डोळे वटारुन पाहताहेत असा भास होतो. हाच तो मघाचा गांधी-चौक. दोन तासापूर्वी एखाद्या पाण्याचा पाईप फुटून त्यातून पाण्याचा लोंढा बाहेर यावा त्याप्रमाणे इथे रस्त्यावर माणसांचा लोंढा दिसत होता आणि आता तो अगदी निर्जीव-अचेतन देहासारखा पडून राहिला आहे.

थोड्याच अंतरावरुन घराकडे वळून जाताना कानावर कचेरीतील टोल येऊन आदळतात एक.. दोन... तीन.... आठ.... नऊ ! नऊ वाजतात. भटकताना वेळेचं भानच राहत नाही; आणि मग घरातील वडील-मंडळीच्या धाकानं पटकन् एक अक्षरही न बोलता मी घाईनं जेवण आटोपतो आणि शतपावली करुन बिछान्यावर अंग टाकून देतो आणि पुन्हा बाहेर भटकायला जातो.... शरीराने नव्हे मनाने ! आणि मग रात्रीच्या राज्यात मनातील विचारांचे भटकणे सुरू होते एका वेगळ्याच आनंदात...!!!

●●●





# मनाच्या दैनिक कोलांट्या

**दिलीप लोणकर**
एस्. वाय. बी. कॉम्

समजा तुम्ही रस्त्याने चाललांत मग एखादवेळेस चुकून किंवा मुद्दाम एखाद्याला किंवा एखादीला धक्का लागतोच की ? आमचंही असंच झालं. आम्ही रस्त्यानं आपलं महत्वाच्या कामाकरीता चाललो असतांना आमचाही धक्का एका बाईला लागला. (अर्थात चुकूनच बरं का ! ) सर्वसामान्य प्रथेप्रमाणे त्या बाईनं रागानं पाहिलं असता आम्ही आपलं 'सॉरी' म्हणून मोकळे झालो. सॉरी म्हटल्यानंतर आता सर्व मिटायला हवं होतं नाही का ? पण ती बाई कसली खोचट ? ती तेथेच थांबली आणि म्हणाली, "मिस्टर ! हा धक्के मारण्याचा तुमचा दुसरा प्रयत्न आहे. अहो शिंगं असलेली जनावरं सुद्धा वाटेनं नीट चालतात. आणि वर सॉरी म्हणताय ? काय आहे काय ? जनाची राहिली मनाची तरी लाज असावी ना जिवाला ?' बाई ताड ताड निघून गेली.

आम्हीही आपलं तोंड बारीक करून आजपासून कुणाला धक्के मारायचं नाही असं ठरवून पुढं निघालो. पण आमच्या डोक्यात त्या बाईच्या बोलण्याचं म्हणजे, 'जनाची राहिली मनाची तरी लाज असावी.' याविषयी विचार चालू होते. म्हणजे मनालासुद्धा लाज असते म्हणायची ? छे ? छे ? ? हे कसं शक्य आहे. लाज ही तर गालावर असते. आणि मराठीतल्या कुणा गीतकारानं गाणंही लिहिलंय, "गाली तुझ्या गं कशी लाज आली ?"

पण ते कांहीही असो. मनाबद्दल आमची उत्सुकता एवढी शिगेला जाऊन पोहोचली की शरीरात मन असतं तरी कुठं ? याचा ठाव ठिकाणा लावायचाच असं आम्ही ठरवलं ! साहजिकच मनाचा शोध सुरू झाला.

सर्वांगावरील अवयवावरून आम्ही एक वेळ डोळे फिरवून पाहिले. पण थोबाडावर डोळे मिशाखाली ओठ, बिटल्सखाली कान याशिवाय कांहीच हाताला लागलं नाही. मन कांही केल्या सापडेना. अखेरीस शेवटी म्हटलं, पाचवी ते अकरावी शरीरशास्त्र विषय शिकत आलो होतो तेव्हा एखाद्या तरी पुस्तकात मनाविषयी उल्लेख असावा सर्व पुस्तके इकडून तिकडून आणून कांही विकत घेऊन चाळून पाहिली, पण मन आणि त्याची कार्ये किंवा मन नावाचा सेपरेट टॉपिक आणि त्याची कार्ये किंवा मन नावाचा सेपरेट टॉपिक आम्हाला कोठे सापडला नाही. पुस्तकवाले सुद्धा चावट लेकाचे ! पुस्तकांत मनुष्याच्या शरीरातील सर्व अवयव दाखवतील पण मनाचा मात्र कोठे उल्लेख करणार

नाहीत. आता तुम्हीच पाहा ना ? मेंदू, हृदय, फुफ्फुस, कवटी, बरगड्या हे सर्व अवयव ते मनुष्याच्या त्या चित्रात दाखवतील पण मन मात्र कोठे दाखवणार नाहीत.

खूप विचार केला मन म्हणजे काय भानगड आहे ? ते मनुष्याच्या शरीरांत असतं का ? असेल तर त्याचा उल्लेख शरीरशास्त्रात का नाही ? पुन्हा विचार बदलला म्हटलं, मन हा शरीराचा एक अश्लील भाग असावा त्यामुळे ते दाखवलं नसेल. पण लगेच एका फेमस मराठी चित्रपटातलं गाणं आठवलं, " काय ग सखू तुझ्या मनात येतं .... " साहजिकच मनाच्या अश्लीलतेबद्दल ज्या भावना होत्या त्या दूर झाल्या.

एक दिवस असाच रस्त्याने चाललो होतो. डोक्यात अर्थात मनाबद्दल विचार होते. चालता चालता समोर टेलिफोन बूथ दिसला. साहजिकच रूस्तुम सोहराब नगरवाला अंगात संचारायला वेळ लागला नाही. टेलीफोन बूथजवळ गेलो, डिरेक्टरीवरुन डोळे फिरवले. मेडिकल कॉलेजचा नंबर एकाकी नजरेस पडला कोण आनंद झाला म्हणून विचारता ? झटदिशी रिंग फिरविली. .

" हॅऽऽऽ ल्लो, कोण बोलतंय ? " ... मी

" मी प्राध्यापक पानसरे आपण ? "

" मी ... मी ... जाऊ द्या ! सर माणसाचं मन कोठे असतं हो ? "

" काय म्हणालात ? " प्रोफेसरांचा रागीट आवाज.

" नाही ! मी म्हटलं माणसाचं मन शरीरात असतं तरी कुठं ? "

" हाऊ नॉनसेन्स ? " . . मी टाणकन उडी मारली तोंडातून जीभ बाहेर काढली. ( नव्हे निघाली ) खरंच मन हा अवयव अश्लील तर नसावा ? पुन्हा आवाज आला, " कुठल्या वर्गात आहात आपण ?

मी थोडासा विचार केला. माझा दोनशे रुपड्या पगार म्हणजे मध्यम वर्गियातच मोडत होता. मी उत्तरलो " मी ... मी मध्यम वर्गात आहे ! "

फोन दाणकन ठेवण्याचा आवाज आला. तितक्याच जोरानं अर्थात आम्हीही आपटला. (सरकारी मालमत्ता).

त्यानंतर बऱ्याच दिवसानंतर आम्हाला एका मित्राकडून गुप्त बातमी कळली की, मन म्हणजे शरीरातील एक गुप्त अवयव आहे. त्याला स्थान असं नसतं. ते कधी इथे असते तर कधी तिथे ! प्रत्येक माणसाला दोन मने असतात. मनाला इंग्रजीत 'माईंड' म्हणतात आणि हिंदीत दिल !

तेव्हापासून मी माझ्या मनाबद्दल सारखाच विचार करीत असतो. आजपर्यंत आमच्या मनानं इतक्या कांही कोलांटच्या उड्या मारल्या आहेत की, एखाद्या पक्षातील कोणा कार्यकर्त्यांनीही मारल्या नसतील. पक्षातील कार्यकर्त्यावरून मंत्री आठवला. खरंच देवांनी यांना तरी दोन मने देऊ नयेत. मंत्र्याना तर नसावीतच. कारण तसं असेल तर ते आपलं मन कसे स्थिर करू शकणार ? उद्घाटनाला गेले असतांना 'खात्याचे' विचार मनात कशाला ?

पुरुषाप्रमाणं स्त्रियानाही मन असतं, पण ते अदृश्य असतं म्हणून तर बरं असतं. नाहीतर तोंडाला पावडर, नाकाला मुरणी, कानाला ईअररिंग्ज, डोळ्याला काजळ, ओठाला लिपस्टिक याप्रमाणेच मनालाही कोणत्यातरी सौंदर्य प्रसाधनाची गरज पडली असती. हो ! आणि एक सांगायचं राहिलंच की, सिनेतारका राखी आपल्या डोळ्यावर, मुमताज नाकावर, जया भादुरी ओठावर तसं मन हेही एखाद्या तरी नटीची स्पेशालीटी होऊन बसली असती. शिवाय हल्लीच्या मुलींनीही आपल्या सुंदर मनाबद्दल भाव मारला असता !

पण एक मात्र वाईट झालं असतं. मुलीचं नाकच आखूड आहे, कुठे डोळेच बारीक आहेत, तर कुठे ओठच बरोबर नाहीत असे म्हणणारे महाभाग नवरेही आपण पाहतो. मन जर शरीरावर असते तर केवढी पंचाईत झाली असती. मुलीचे मन चांगले नाही तेव्हा ही मुलगी आपल्याला पसंत नाही. असे अनेक नव-नवरे म्हणाले असते. जाऊ द्या. मन चांगले नाही म्हणून मुलगी नाकारली असं अद्यापर्यंतच्या लग्नांच्या इतिहासांत तरी ऐकिवात नाही.

प्रेयसीचे मन हा एक स्वतंत्र चर्चेचा विषय आहे. प्रेयसीच्या दिलाची ( मनाची म्हणण्यापेक्षा दिलाची म्हणू ) चोरी करणे म्हणजे कठीण काम. पण यातूनही सहीसलामत चोरी करुन सक्सेसफूल झालेलेही आहेत. ( नशीब इंडियन पीनल कोड मध्ये त्या चोरीबद्दल तरी कांही कायदा नाही. नाहीतर किती जणांना दररोज कोर्टात खेचावं लागलं असतं कुणास ठाऊक ? ) पण प्रेमांत सक्सेसफूल झाल्यानंतर त्यानांही कळून चूकलेलं असतं की खरोखर आपण 'फूल' झालो.

प्रियकरांना प्रेयसीचे दिल जर सहजासहजी चोरता आले असते तर त्यांना इतका खटाटोप करावाच लागला नसता. सरळ सरळ जाऊन तिच्या दिलाचो मागणी ( वधू–वराची करतात तशी ) करता आली असती. पण ते तरी कुठे शक्य आहे ? तिच्या मनात काय असतं हे तरी कुठं ओळखता येत असतं ? मग तिच्या मागे फिरुन " दिल दे दिल ले यही मुहब्बत है " असं म्हणावच लागलं नसतं. उघड उघड जर असं दिल देता येत असतं तर न जाणो काय काय भानगडी घडल्या असत्या. प्रत्येकानं आपलं दिलं काढून वाटेवर ठेवलं असतं ! चला तेवढंच उचललं कोणी तर उचललं ( नाहीतर पायाखाली तुडवून दिलाचे हजारो तुकडे तरी केलेच असते )

मनाच्या बाबतीत मराठीत एक म्हण आहे. 'ऐकावे जनाचे करावे मनाचे' पण आम्हाला वाटतयं ही म्हण साफ चुकीची आहे. असं जर असतं तर, आज " कॉपी करु नको " असे म्हातारे कोतारे लोक सांगत असतांना आम्ही परीक्षेत कॉपी करुन दोन तीन वर्षे रस्टीकेट का झालो असतो ? मटक्याचा आकडा लागत नसतांना लावून कंगाल का बनलो असतो ? अमुक तमकीच्या नादी लागू नकोस असे बहुजन सांगत असतांना तिच्या नादी लागून दिला ऐवजी गाल का रंगवून घेतले असते ? असे हे मनाचे ऐकून 'मनाने' वागल्याचे परिणाम. म्हणजे मनसुद्धा कधी कधी धोका देतं म्हणायचं ?

त्याचप्रमाणं मराठीत दुसरी एक म्हण मनाच्या बाबतीतच आहे, " मनी वसे ते स्वप्नी दिसे " म्हणजे स्वप्नात उत्पन्न होणाऱ्या चित्राचं मन हे एक कोठारच म्हणायला हरकत नाही. पण प्रत्यक्षात जरी मिळालं नाही तरी स्वप्नात तरी मन सुख देऊन जातं एवढं मात्र खरं ! आता हेच पाहा ना ? समजा आपण एखादं लॉटरीचं तिकीट एक रुपाया वाया घालवून काढलेलं असतं. लॉटरीचा निकाल लागायला अर्थात बराच अवधी असतो. तोपर्यंत आपण मनात मात्र नाना तऱ्हेची सुखद चित्रे रंगवतो. मोटार घेण्यापासून ते बंगला बांधण्यापर्यंत ! " शेवटी लॉटरी लागत नाही हे बाजूलाच पण लॉटरी लागेपर्यंत तरी मन सुखद दिलासा देऊन जातं.

त्याचप्रमाणं एखादवेळेस सहज एकांतात बसलं असतांना आपण मंत्री आहोत इथपासून ते सिनेनटी स्वप्नात येऊन ... . . जाऊ द्या ! इथपर्यंत चित्रे रंगवली जातातच की !

कित्येक माणसं एखाद्या व्यक्तीचं वर्णन करतांना नेहमी म्हणतात, " तो ... तो ना ? फार मोठ्या मनाचा माणूस आहे " ... म्हणजे देवसुद्धा लहान मोठं मन देऊत वशिलेबाजी करतोच म्हणायचं की ? त्याचप्रमाणे हल्लीच्या तरुण तुर्कातही गप्पाच्या ओघात विषय निघतो अरे यार ती ना ? फार " फ्री माईन्डेड " आहे मग आम्ही म्हणतो शंभरात एखाद्याच मुलीला 'फ्री माईन्ड' देण्यापेक्षा सर्वच मुलींना 'फ्री माईन्ड' देऊन टाकायचं देवानं ! काय बिघडतंय त्यांत !

# काळे वर्तुळ

गजानन भिडे
एस्. वाय्. बी. ए.

अजूनही मी त्याच केसचा विचार करीत होतो. विकृत वर्तन करणाऱ्या अशा कित्येक लोकांच्या केसेस मी हाताळल्या होत्या. पण ही केस काही निराळी होती. एका तरुणाची. तो तरुण मला खरोखरच विचित्र वाटला. गूढ वाटला. 'विश्वात अशा प्रकारची किती तरी गूढं आहेत, त्यांचा अद्याप शोध लागलेला नाही,' असे माझे स्नेही इन्स्पेक्टर गोरे म्हणाले होते. त्याची प्रचिती मला येत होती.

त्या दिवशी संध्याकाळचे सहा वाजून गेले होते. नुकताच पाऊस पडून गेला होता, सगळीकडे अंधारुन आलं होतं. काळ्या ढगात अजूनही विजा चमकतच होत्या. मी ट्यूबच्या प्रकाशात पुस्तक वाचीत बसलो होतो. त्याचवेळी पंचवीस ते तीस या वयाचा एक तरुण केबिनचं दार उघडून आत आला. तो घाबरला होता हे त्याच्या चेहेऱ्यावरून स्पष्ट दिसत होतं. मी खुणेसाठी कागदाचा कपटा पानामध्ये घालून पुस्तक मिटवून ठेवले, नि त्यास म्हणालो "बसा." तो समोरच्या खुर्चीवर बसला.

टेबलावरची वही जवळ ओढली, पेन उघडला आणि पेशंटस्‌ना विचारण्यात येणारा पहिला प्रश्न मी त्याला विचारला –

'नाव काय आपलं ?'

'सदानंद गोडसे." त्यानं उत्तर दिलं. मी नाव लिहून घेतलं.

'वय'

'अठ्ठावीस'

'मॅरिड ?'

'ऑफ कोर्स'

'चाइल्ड ?' मी विचारले.

'सध्या एकच.' त्यानं सांगितलं.

'बर आता गोडसे हे सांगा आपण असे घाबरलेले का दिसता ?" विषयाला मी हात घातला.

'डॉक्टर, मला काही होतय, ते भास आहेत, स्वप्न आहेत, कि सत्य आहे हेच समजत नाही."

'म्हणजे एग्झॅक्ट काय होतंय ?' माझा प्रश्न. त्यानं सुरुवात केली,

'ऑफिसात बसलो असताना एकदम डोळे मिटतात. समोर एक मोठं काळ वर्तुळ निर्माण होतं. त्या वर्तुळातून एक तरुण स्त्री, पुरुषाबरोबर येते. ती माझ्याकडे बोट दाखविते आणि बरोबरच्या पुरुषास सांगते, तो पहा नीच. यानंच मला फसवून दुसरीशी लग्न केलं. तो पुरुष चिडतो, म्हणतो, पहातोच त्याच्याकडं. म्हणत तो खिशातून पिस्तूल काढतो. त्यावेळी मी ओरडतो, तो मी नव्हे, तो मी नव्हे. त्याच्या पिस्तुलातून गोळी बाहेर पडण्यापूर्वीच – ऑफिसचा शिपाई मला जागा करतो, साहेब तुम्ही ओरडलात. त्यावेळी मी भानावर येतो तेव्हा डॉक्टर, तो पुढे म्हणाला– 'माझा नक्कीच खून होणार आहे, खून, खून, पोलिस.' त्याने आपला हात फोनकडे नेला. पण त्याला थांबवित मी म्हणालो–

'गोडसे, हा भास आहे, निव्वळ भास.'

'हा सत्य भास आहे.' गोडसे म्हणाला.

'बर असू देत सत्याभास. पण मला कांही प्रश्नांची उत्तरे द्या.'

'विचारा !'

'लग्नापूर्वी आपली अशी काही भानगड होती काय ?'

'नाही. मी अशा भानगडीत कधी पडलोच नाही.' त्याने स्पष्ट उत्तर दिले.

'लग्न झाल्यावर काही ?'

'छे! डॉक्टर, मला एवढी सुंदर बायको असताना कशाला काय करू !'

'आपल्याला आठवत नसेल कदाचित, कुणाला तरी लग्नाचं वचन दिलं असेल ?'

'No, no तसं होणार नाही.' त्याचं ठाम उत्तर.

'मग हे नक्कीच भास म्हणावे लागतील.' माझी निश्चीती झाली.

'हे भास थांबले पाहिजेत, Please डॉक्टर Please' गोडसे.

'पाहू प्रयत्न करीन' मी.

मी असं म्हणल्यानंतर समाधानाची एक अस्पष्ट रेषा त्याच्या चेहेऱ्यावर उमटली. नंतर गोडसे निघून गेला.

पुढे दोन दिवसांनी एक तरूण स्त्री आली. आत, आल्या आल्याच अपराधी स्वरात ओरडली, 'डॉक्टर डॉक्टर माझ्या नवऱ्याने खून केलाय, माझ्या नवऱ्याने खून केलाय.' मी तिच्याकडे शांतपणे पाहिल नि म्हटलं– 'बसा तुम्ही अगोदर.' तेव्हा ती खुर्चीवर बसली. नेहमीचा प्रश्न मी विचारला–

'नाव काय तुमचं ?'

'सौ. शुभदा राणे'

'वय ?'

'बावीस.'

'हे सांगा मिसेस राणे, आत्ता तुम्ही का ओरडलात ?'

'कारण माझ्या पतीच्या हातून खून झालाय !', एकदम तिनं सांगितलं.

'कुणाचा ?' मी आश्चर्यानं विचारलं.

'एका तरूणाचा.' या उत्तरानंतर का कुणास ठाऊक माझ्या अंतःचक्षूसमोर त्या गोडसेचा चेहरा उभा राहिला. क्षणभर मी सुद्धा गप्प राहिलो. पण पुन्हा मी विचारलं–

'खून कधी झालाय ?'

'काल.'

'पण हा खून तुमच्याच पतिनी केलाय याला पुरावा काय ?' मी पोलिस इन्स्पेक्टरच्या आविर्भावात विचारलं.

'मी प्रत्यक्ष पाहिलं' मिसेस राणेचं उत्तर.

'कस काय ?' मी

तसं तिनं सुरुवात केली.

'काल दुपारी मी झोपले होते. तेव्हा मला एक स्वप्न पडलं. मी आणि माझे पती गणेश कॉलनीत फिरायला गेलो होतो. समोर एक तरूण दिसला. एकदम मी यांना म्हणाले 'त्यानेच मला फसवून दुसरीशी लग्न केलं.' तेव्हा ते चिडले आणि खिशातून पिस्तुल काढले नि दुसऱ्याच क्षणाला गोळी झाडली. तो खाली पडला नि त्याच्या भोवती एक काळे वतुळ निर्माण झाले. ते वर्तुळ छोटे छोटे होत गेले, अन् त्याचा मृत देह पण.'

'हे स्वप्न आहे असं तुम्ही म्हणता.'

'होय.'

'मग स्वप्न खरी असतात असं कुणी सांगितलं तुम्हाला ?'

'डॉक्टर, हे दिवा स्वप्न आहे.'

'नाही मिसेस राणे, माझ्यावर विश्वास ठेवा.'

'फारतर गणेश कॉलनीत चौकशी करा.' राणे

'चौकशी करेन पण मला तसे वाटत नाही.'– मी.

'मला तसं वाटतंय ना, बरं मी येते,' म्हणत ती केबिनच्या बाहेर पडली.

ती गेल्यावर मी विचार करायला लागलो. त्या गोडसेच्या वर्णनातील स्त्री हीच असावी. अन् या तरूणीच्या वर्णनातील तरूण गोडसेच असावा. दोन्हीत बरेच साम्य. पण हे कस शक्य आहे. असं असू शकतं का ? हे भास असतील का ? को स्वप्न ? पण दोन व्यक्तींना सारखेच भास कसे होतील ? यात वास्तवता असेल का ? गोडसे वेडा म्हणावा तर ती तरूणी वेडीच म्हणावी लागेल. छे ! मी उलट सुलट विचार केला. एक कल्पना आली नि फोन जवळ ओढला, रिसिव्हर हातात घेऊन नंबर फिरविला—

'एस्, मी गाडगीळ बोलतोय.'

'मी इन्स्पेक्टर गोरे.'

'अच्छा, हे पहा इन्स्पेक्टर, काल गणेश कॉलनीत एखादा खून झालाय का ?' मी शंका सांगितली.

'खून ? छे हो, एवढीशी गणेश कॉलनी तिथे कुठला खून ? आणि झालाच तर आम्हाला लगेच समजतं.'

'बरं, बरं Thanks मी रिसिव्हर ठेवून दिला.

नतर दोन-तीन दिवसांनी एक फोन आला.

'हॅलो, कोण बोलतयं ? ' मी विचारलं.

'आबासाहेब गाडगीळ आपणच ना ? ' पलिकडून प्रश्न.

'होय, मीच. पण आपण ? '

'मी मिसेस गोडसे !' त्या स्त्रीनं सांगितलं.

'म्हणजे परवा माझ्याकडे आलेले सदानंद गोडसे यांच्या पत्नी का ? '

'होय.'

'काय काम आहे ? '

'डॉक्टर, लवकर इकडे या. हे कसेतरी करतायत. ओरडतायत्, बरळतायत्. टिळकरोड 'स्मृती' बिल्डींगमध्ये वरचा मजला आमचाच.'

'बर, मी निघतोच.' म्हणून मी रिसिव्हर ठेवून दिला.

मी दहा पंधरा मिनिटातच तिथे जाऊन पोहोचलो. सदानंद गोडसे कॉटवर झोपला होता. अजुनही बडबड चालू होतीच. 'माझा खून होतोय, तो पहा, पोलीस... तेच तेच काळे वर्तुळ... हे काळे वर्तुळ माझा काळ आहे.'

'गोडसे, अहो गोडसे' मी त्याला जागे करीत होतो.

'मी तो नव्हे, नाही मी कुणाला फसविले नाही.' पूर्ण जागे झाल्यानंतर गोडसेने डोळे उघडले.

'कोण डॉक्टर का ? '

'होय मीच.'

'डॉक्टर, आत्ता मला काय झालं होतं ?'

'तुम्ही ओरडत होतात !'

'बघा डॉक्टर, यावेळी माझे मला सुद्धा काही कळत नाही' तो असह्य होत म्हणाला.

'हे पहा तुम्हाला पूर्ण विश्रांतीची जरूर आहे. आठ दिवस रजा काढून जरा बाहेर गावी जावून या. नंतर पाहू काय करायचे ते.' मी सल्ला दिला.

'बर येतोच हिंडून जरा बाहेरगावी.' चहा घेतल्यानंतर मी निरोप घेतला.

आठ-दहा दिवसांच्या अवधित काहीच घडलं नाही. गोडसे तर गावालाच गेला होता. परत ती स्त्री पण आली नव्हती. मला वाटलं, संपले हे भास. वाटलं संपली ही स्वप्नं. होतं असं कधी कधी. स्वप्नात घडणाऱ्या गोष्टींचा जबरदस्त पगडा मनावर बसतो आणि त्या घटना वास्तव वाटू लागतात. या दोन केसेस अशाच होत्या. पण माझ्या कल्पनांना गोडसेने धक्का दिला.

पुन्हा तो केबिनमध्ये आला. त्या दिवशी गुरूवार होता. बाहेर स्वच्छ ऊन पडलं होतं. मी ताजा पेपर वाचीत बसलो होतो. तेवढ्यात तो घाबऱ्या घाबऱ्या आत आला. मला विलक्षण आश्चर्य वाटलं.

'काहो काय झालं ? ' मी विचारलं.

'डॉक्टर, उगाच बाहेर गेलो असं वाटायला लागलं.'

'का ? '

'बाहेर तर फार त्रास झाला धड झोप येत नव्हती.' आता मी पुरा थक्क झालो तो पुढे म्हणाला—

'ते काळे वर्तुळ, तीच दोघं.. तेच पिस्तुल... अन् त्यानं मारलेली गोळी.'

मी काहीच बोललो नाही. तोच पुढे बोलला.

'डॉक्टर हे काही विचित्रच आहे. मला लक्षण ठीक दिसत नाही. जीवाचं काही बरं वाईट होईल असं वाटतंय.'

'धीर धरा गोडसे. काही दिवसांनी हे संपेल' मी म्हणालो.

'नाही संपणार डॉक्टर.'

'पण माझ्यावर विश्वास ठेवा.' मी त्याला विश्वासात घेण्याचा प्रयत्न केला.

'नाही नाही, ते पहा काळे वर्तुळ आले... आले,' त्यानं केबिनच्या खिडकीकडे बोट दाखविले. खिडकीत काहीच नव्हते. पांढरा लख्ख प्रकाश काचेवर पडला होता त्याला काय दिसत होते कुणास ठाऊक. नंतर तो बराच वेळ तसाच बडबडत राहिला. आता तर तो जागेपणी बडबडत होता मी याचा विचार करायला लागलो. नि त्याच्या या रहस्यात बुडून गेलो

तो केव्हाच तरी निघून गेला होता... आणि अजूनही मी विचारच करतोय काय असेल हे ?



*With best compliments from–*

**SWASTIK LABORATORY & INDUSTRIAL CHEMICALS PVT. LTD.**

SLIC

Office
**176/7, Sadashiv Peth**
**Poona - 411030**
Phone - 56110

Factory
**29, Hadapsar Industrial**
**Estate, Poona - 411030**
Phone - 7175

Telegram - LABCHEM

*Manufacturers of – Laboratory & Industrial Chemicals.*



*With best compliments from–*

**SHRI KRISHNA RESTAURANT**

**Lodging & Restaurant**
**BARAMATI**

☎ 260

नयनरम्य रंग व मनमोहक डिझाईन्सच्या
नित्य नूतन फॅशन्सच्या तयार
कपडयांचा खजिना !

★ राजेंद्र ड्रेसेस ★

फर्म–
मेसर्स शांतीलाल मगनलाल मेहता
'कृषिराज' मिश्रखताचे कारखानदार

स्टेशन रोड, बारामती जि. पुणे

☎ ३५६

आपल्या जीवनातील आनंदाचे क्षण
फोटोच्या चौकटीत टिपून ठेवण्यासाठी
बारामती इंदापूर भागात अग्रेसर ठरलेला

पटवा फोटो स्टुडिओ

वालचंदनगर

प्रोप्रा.– उज्वल पटवा

WITH BEST COMPLIMENTS FROM

TILAK
SPORTS

DECCAN GYMKHANA POONA-4

Branches– Hubli & Sholapur

Factory – Swargate, POONA - 9

फोन ४९० घरचा ४९१

मे. महाराष्ट्र सीडस्
सप्लायर्स

सिनेमा रोड, बारामती

बियाणे * मिश्रखते

पीकसंरक्षक औषधे

नॅशनल सीडस् कार्पोरेशनचे अधिकृत विक्रेते



# भारतातील लोकशाही नियोजनाचे यश–

एम. बी. मुलाणी
टी. वाय्. बी. ए.

**महाविद्यालयातील नियोजन मंडळातर्फे घेतलेल्या 'भारतातील लोकशाही नियोजनाचे यश' या निबंधस्पर्धेत प्रथम पारितोषिक - पात्र निबंधाचा सारांश देत आहोत.**

भारत हा खंडप्राय देश आहे. अशा खंडप्राय देशाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत जात आहे. त्यामुळे भारतापुढे लोकसंख्येमुळे निर्माण होणारे अनेक प्रश्न आ वासून उभे आहेत. शिवाय भारताने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर लोकशाही राज्य पद्धतीचा स्वीकार केला. स्वातंत्र्यापूर्वी आपणावर इंग्लडचे १५० वर्षे राज्य होते. त्यावेळेस आपणास नियोजनाची आवश्यकता भासली नाही. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण लोकशाही नियोजनाचा स्वीकार केला. तेव्हा प्रथम आपण नियोजन म्हणजे काय याची व्याख्या पाहू. आपल्या नियोजन मंडळाने नियोजनाची पुढील प्रमाणे व्याख्या केलेली आहे. " देशातील साधनसामग्री संघटित करून तिचा जास्तीतजास्त उपयोग करून घेऊन ठरलेली सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्याकरिता आखण्यात आलेला मार्ग किंवा पद्धती होय. " ( " A way of organising and utilising resources to maximum advautages in terms of defined social ends ")

सर्वसामान्यपणे आपणास लोकशाही नियोजन आणि सर्वंकष नियोजन याचा विचार करणे जरुरीचे आहे. प्रामुख्याने रशियात जे नियोजन आहे ते सर्वंकष नियोजन आहे. तर भारतातील नियोजन हे लोकशाही नियोजन आहे. लोकशाही नियोजन हे प्रामुख्याने लोकांच्या स्वयंपूर्ण सहकार्यावर अवलंबून असते. लोकशाही नियोजनाचा पाया सहकार्य हा असतो दुःख, सक्ती इत्यादिकांचा अवलंब लोकशाही नियोजनात केला जात नाही. लोकशाही नियोजनामध्ये प्रगति आणि विकास हा मंदगतीने होत असतो. उलट सर्वंकष नियोजनात लोकांना कोणत्याही प्रकारचे स्थान नसते. सरकार जे सांगेल, जो कायदा करील आणि जे धोरण आखील ते मान्य असो अगर नसो ते जनतेने निमूटपणे स्वीकारलेच पाहिजे अशी सक्ती केली जाते. म्हणजे सर्वंकष नियोजनात फार थोडया वेळात अतिशय मोठी प्रगति केली जाते. परंतु ती लोकांच्या दुःखावर आणि जुलूम जबरदस्तीवर आधारलेली अशी असते.

भारतातील लोकशाही नियोजनाची उद्दिष्टे कोणती आहेत याचा देखील विचार करणे जरुरीचे आहे. तेव्हा लोकशाही नियोजनाची उद्दिष्टचे आपणास खालीलप्रमाणे सांगता येतील–

भारतातील नियोजनाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे जनतेच्या राहणीचा दर्जा उंच पातळीवर नेण्यासाठी आणि जनतेला अधिक समृद्ध आणि विविध प्रकारचे जीवन जगता यावे ह्यासाठी विकासाची प्रक्रिया सुरू करून देणे हे असून त्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या काळाची विभागणी पंचवार्षिक योजनात केली असून ह्या प्रत्येक योजनेच्या कालखंडात काही अल्पकालीन

उद्दिष्टचे साध्य करून घेण्याच्या दृष्टीने योजनांची आखणी करण्यात आलेलीआहे. त्या दृष्टीने आपण आतापर्यंत चार पंचवार्षिक योजना पार पाडल्या आहेत. प्रत्येक योजनेत आपली निरनिराळी उद्दिष्टचे होती.

१९५१ पासून आपल्या लोकशाही नियोजनाला सुरुवात झाली. आणि पहिली योजना आखली गेली. त्यावेळी आपण प्रामुख्याने शेती ह्या व्यवसायावर मोठ्या प्रमाणात भर दिला होता. एकूण खर्चापैकी १५% रक्कम ही शेतीवरच खर्च केली होती. तसेच कालवे व पाणी पुरवठ्याच्या सोयीसाठी २९% रक्कम खर्च केली होती त्यामुळे साहजिकच आपणास पहिल्या योजना काळात हवामान आणि पाऊसपाणी शेतीला अनुकूल राहिल्यामुळे आणि शेतीत योग्य त्या सुधारणा झाल्या त्यामुळे साहजिकच आपण पहिल्या योजनेत अन्न–धान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालो.

दुसऱ्या योजनेत आपण औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणूक करण्याचे ठरविले. आणि त्यादृष्टीने आपण १९५५–५६ ते १९६०-६१ ह्या काळात औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक १३९ पासून १९४ पर्यंत वाढला. व असा हा औद्योगिक विकास मुख्यतः सार्वजनिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर दिसून आला. दगडी कोळशाच्या उत्पादनात ३८४ लाख टनावरून ५४६ लाख टनापर्यंत वाढ झाली. तसेच दुसऱ्या योजनेत शैक्षणिक क्षेत्रात देखील वाढ झाली तिसऱ्या योजनेत वाहतुकीच्या क्षेत्रात अपेक्षेपेक्षा मोठ्या प्रमाणात यश आले. रस्ते बांधणी, जहाज–निर्मिती, बंदरांचा विकास, हवाई वाहतूक पोष्ट आणि तारखाते ह्यांची प्रगती ह्याबाबतीत अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळवता आले. अशाप्रकारे तिसऱ्या योजनेच्या काळात उद्योगधंदे, वाहतूक, दळणवळण, शिक्षण आणि आरोग्य ह्या क्षेत्रात प्रगती झाली.

नंतर आपल्या नियोजनाने प्रत्येक वर्षी नियोजन अशा स्वरूपाचा निर्णय घेतला. कारण नियोजन मंडळापुढे अनेक समस्या उभ्या राहिल्या होत्या. त्यासाठी म्हणून वार्षिक योजना आखण्यात आल्या. ह्या तीन योजनांत कमी अधिक प्रमाणांत नुकसानच सहन करावे लागले. एवढेच सांगता येईल की ह्या काळात दरडोई उत्पन्नात २४७.५ रुपयापासून ३१४.४ रुपयांपर्यंत वाढ होऊ लागली. त्यानंतर आपली चौथी पंचवार्षिक योजना १९६९ ते ७४ ह्या कालासाठी आखण्यात आली. चौथ्या योजनेत आपणास किती प्रमाणांत यश आले याचा विचार केल्यास असेच सांगावेसे वाटते की आपली चौथी योजना ही बहुअंशी उद्दिष्टांच्या संदर्भात अपयशीच झालेली आहे. अशाप्रकारे आपण आतापर्यंत आपणास कशाप्रकारे यश मिळाले याचा स्थूलमानाने विचार केलेला आहे. कारण आपणास यशापेक्षा अपयशच अनेक ठिकाणी आले आहे. त्यामुळे अपयशाचा विचार करणे जरुरीचे आहे.

सामान्यपणे आतापर्यंत आपण चार पंचवार्षिक योजना पार पाडल्या असे म्हणता येईल पहिल्या पंचवार्षिक योजनेत आपण शेतीत प्रगती केली असली तरी आपणास इतर ठिकाणी किंवा इतर क्षेत्रात अपयशच आलले आहे. उद्योगधंद्याच्या वाढीकडे पहिल्या योजनेत योग्य तेवढे लक्ष दिले गेले नाही. एकूण खर्चापैकी फक्त ७.९% रक्कम उद्योग धंद्याच्या विकासासाठी खर्च केली. त्यामुळे आपली उद्योगधंद्याच्या बाबतीत प्रगती झाली नाही तसेच योजनाकाळात कर, कर्जे इत्यादी मार्गांनी अपेक्षेइतकी रक्कम जमा झाली नाही. त्यामुळे आपणास चलनव.ढ करावी लागली. तसेच पहिल्या योजनेच्या काळात तुटीचा अर्थ भरणा करावा लागला किंमतवाढ झाली असे पाहवयास मिळते. कोरियाच्या युद्धामुळे सर्वसाधारण निर्देशांक ४०९ पर्यंत वाढला. व पहिल्या योजनेच्या सुरुवातीला ४५७.५ पर्यंत वाढला राहणीमान वाढविण्याचे आणि बेकारी कमी करण्याचे आपले उद्दिष्ट होते पण ते आपण आपल्या नियोजनाद्वारे पूर्ण करू शकलो नाही.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत देखील अपेक्षेप्रमाणे पैसा उभा करता आला नाही. त्यामुळे तुटीचा अर्थभरणा करावा लागला. शिवाय ह्याच काळात आपल्यावर परकीय चलनाचा बोजा वाढला. चलनवाढ झाली. त्यामुळे लोकांचा नियोजनावरचा विश्वास कमी होऊ लागला. १५३ लाख लोकांपैकी फक्त १०० लाख लोकांना रोजगार पुरविता आला. परदेशी हुंडणावळीचा वापर जपून न केल्यामुळे आणि हुंडणावळीच्या बाबत अंदाज चुकल्यामुळे पाच वर्षाच्या काळात पौंडी शिलकीतून २००० कोटी रुपयाचे चलन परकीय चलन हुंडणावळीमधून खर्च करावे लागले. तसेच दुसऱ्या योजनेत २५% एवढी वाढ घडवून आणण्याचे उद्दिष्ट पुढे ठेवले होते परंतु प्रत्यक्षात ती वाढ २०% एवढीच झाली. शेतीकरिता आवश्यक असणारी यंत्रसामुग्री आणि साधनसामुग्री मिळाली नाही त्यामुळे इष्टांकाइतके उत्पादन शेतीमधून मिळालेच नाही.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत राष्ट्रीय उत्पन्न २५% वाढविण्याचे उद्दिष्ट होते. पण ते प्रत्यक्षात १७% वाढले. तसेच शेतीची प्रगती देखील उपेक्षेप्रमाणे झाली नाही. उद्योगधंद्यांची देखिल अपेक्षित असलेली वाढ झाली नाही तसेच ह्या योजनेत परकीय चलनाची टंचाई, गुंतवणुकीत घट आली. निरनिराळ्या उद्योगधंद्यात देखील घटच होत गेली असेच पाहावयास मिळते. वीजनिर्मितीत देखील घट झाली. तिसऱ्या योजनेच्या शेवटी देखील आपण बेकारीचा प्रश्न सोडवू शकलो नाही.

चौथ्या योजनेत देखील अनेक क्षेत्रात आपणास अपयशच आले. योजना काळात राष्ट्रीय उत्पन्नात दरवर्षी ५.५% नी वाढ घटवून आणावयाची होती परंतु गेल्या १८ वर्षांचा अनुभव पाहता राष्ट्रीय उत्पन्न सरासरीने ३–३॥ टक्यांनी वाढले. चौथ्या योजनेत सार्वजनिक क्षेत्र वाढविण्याचे ध्येय होते ते पूर्ण झाले नाही. उलट भांडवलदारांचीच सोय केली.

अशाप्रकारे आतापर्यंत आपणास अनेक ठिकाणी नियोजनामुळे अपयश आले. त्याला कोणती कारणे कारणीभूत झाली असतील त्याचा विचार करणे जरुरीचे आहे. साधारणपणे आपण लोकशाही राज्यपद्धतीचा स्वीकार केला आहे त्यामुळे आपल्या देशात प्रत्येकाला व्यक्तिस्वातंत्र्य दिलेले आहे. त्यामुळे साहजिकच आपल्या देशात अनेक पक्ष आहेत त्यामुळे नियोजनाची अंमलबजावणी करत असताना राजकीय पक्षाला सर्व वर्गांचा विचार करावा लागतो.

१९७१ साली निवडणुका झाल्या. त्यावेळेस आपाल्या काँग्रेस पक्षाचे एवढेच लक्ष्य होते की, आपण आपली सत्ता बळकट करावयाची त्यासाठी आपल्या पंतप्रधानांनी "गरीबी हटाव" या योजनेचा उपयोग केला. त्यामुळे जनतेची दिशाभूल झाली. आणि त्याचा परिणाम असा झाला की काँग्रेस पक्षाने बहुमताने निवडणूक जिंकली पण आजतागायत आपण पह.त आहोत की काँग्रेस पक्ष आपली घोषणा पूर्ण करू शकत नाही.

अर्थशास्त्रज्ञांना मर्यादित स्थान– सर्व निर्णय हे राजकीय पक्षाकडून घेतलेले असतात. आणि राजकीय पक्षातील पुढारी कसे असतात याचा आपणास चांगलाच अनुभव आहे. कारण भारतातील पुढारी हे बुद्धिशून्य असतात, आहेत आणि होते असे म्हटल्यास ते अतिशयोक्ती होणार नाही. त्यांना निवडणूक जिंकण्या पलीकडे काहीही माहीत नसते. अशा व्यक्तिकडून जर नियोजन आखले जात असेल तर ते किती प्रमाणात यशस्वी होईल आणि झाले आहे याची आपणास प्रचीती आलेलीच आहे. तसेच सामाजिक–राजकीय–आर्थिक परिस्थितीचा विचार सरकारने नियोजन करताना केलेला नाही.

तसेच लोकशाहीला काही मर्यादा घातल्या पाहिजेत, तसेच नियोजनात देखील काही थोड्या प्रमाणांत काही नियंत्रणे असणे आवश्यक आहे. तरच आपले लोकशाही नियोजन यशस्वी होईल. मुक्त अर्थव्यवस्था थोड्या प्रमाणात पाहिजे आणि नियंत्रित अर्थव्यवस्था थोड्याफार प्रमाणांत पाहिजे आणि त्यांचा योग्य असा संयोग घालून त्यानुसार नियोजनाची अंमलबजावणी केल्यास आज आपणास जेवढ्या प्रमाणात अपयश आले तेवढ्या तीव्रतेने आपणास अपयश येणार नाही हे निश्चित. कै. धनंजयराव गाडगीळ यानी लोकशाही नियोजन यशस्वी करण्याचा एक मार्ग सुचविला तो म्हणजे 'सहकारी चळवळ'

सारांश आपण आतापर्यंत काही उद्दिष्टचे साध्य करण्याचे ठरविले होते. त्यातील काही साध्य झाली काही नाही. उदा.– समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट आपण साध्य करू शकलो नाही. मात्र सर्वदृष्टीने चाललेले यत्न अभिनंदनीय आहेत यात शंका नाही.


卐卐



# मेसर्स अरहतदास हिराचंद शहा

## सराफ

### मेनरोड, बारामती





**आमच्याकडे शुद्ध चांदीचे व सोन्याचे सर्व प्रकारचे दागिने तयार मिळतील. तसेच ऑर्डर दिल्यास खात्रीशीर तयार करून मिळतील.**




# खिलते हैं गुल यहाँ..

**यशवंत गरगटे**

एफ्. वाय्. बीएस्सी.

" खिलते हैं गुल यहाँ। खिलके बिखरनेको ।
मिलते हैं दिल यहाँ। मिलके बिछडनेको ।"

कॉलेजचे गॅदरिंग पहायला मी गेलो होतो. त्या दिवशी हे गाणं वहिनीने गायिले होते खरं तर त्यावेळी ती माझी वहिनी नव्हती. ज्यावेळी 'एकच प्याला' या नाटकातील तिची सिंधूची भूमिका मी पाहिली तेव्हा ठरवलं दादाला अशीच बायको हवी, नव्हे मला अशी वहिनी हवी. वहिनी म्हणजे साक्षात् सौंदर्य, वहिनी म्हणजे जणू ह्या भूतलावरील गान - कोकिळा ! वहिनी म्हणजे दया-क्षमा-शांती ह्यांचा एक समुच्चयच. मला तीच वहिनी हवी होती म्हणून मी हट्ट धरला होता.

अन विलक्षण आश्चर्याचा धक्का मला बसला. तिने स्वतःच मला सांगितले की, मी तुमची वहिनी आहे. 'तुमची वहिनी'. माझा क्षणभर विश्वासच बसेना. खरं आहे; तिने माझ्या मनातली शंका लगेच ओळखली अन् पटकन् मला आपल्या जवळ घेतले नि पुन्हा म्हणाली हो अगदी खर हो तुमची वहिनी आहे. मोठी वहिनी आपल्या आईसारखी असते ना ? मग आपल्या आईजवळ येताना एवढा सकोच कशाला ? वहिनीचे जिव्हाळ्याचे ते शब्द ऐकताच माझ्या मनाचा बांध फुटला नि मी आसवांना वाट करून दिली, मला फार फार दिवसांनी एवढ्या तीव्रतेने आईची आठवण झाली वहिनी सारखं मायेने मला थोपटत होती, कुरवाळत होती, पण मला रडू आवरेना. एका डोळ्यातून दुःखाश्रू नि दुसऱ्या डोळ्यातून आनंदाश्रू बाहेर पडत होते मी आनंदाने अगदी ओरडलोच. 'तू . . तू खरंच माझी माझी आई होणार आहेस वहिनी ! खरंच ! ' तिच्या फक्त डोळ्यांनीच मला काय हवे ते सांगितले. लवकरच माझ्या घरात आई येणार होती. आई! आई!

वहिनी घरात आली घराला घरपण आलं. घरात नवचैतन्य आलं. घरात वसत ऋतु बहरला. अन् मी - मी मात्र आणखी ७–८ वर्षांनी लहान झालो. मी खूप हट्टी बनलो. माझ सारे हट्ट वहिनी शांतपणें पुरवत असे. वहिनीची अन् माझी इतकी गट्टी जमली की वहिनी दादाच्या वाटेला फार वेळ येत नसे. दादा माझ्यावर खूप खूप चिडत असे, रागवत असे. पण पुन्हा वहिनीकडे पहाताच त्याचा राग पार दडी मारून बसे. दिवस असे हसत खेळत पटापट गेले. बघता बघता माझी कॉलेजची २ वर्षे संपली. माझा मेडिकलला नंबर लागला. कोण कौतुक केलं माझं वहिनीने. मी आतां तिच्यापासून दूर जाणार म्हणून तिला खूप वाईट वाटले. आठवड्यातून एक पत्र पाठवायचे मी कबूल केले तेव्हा आमची रडूबाई हसली. डोळे पुसत म्हणते कशी, 'भाऊजी, तुम्ही मोठे झालात तरी मला मात्र लहानच आहात हो.'

मी दादा-वहिनीला सोडून आलो पण मला तिथे अजिबात करमत नसे. वाटायचं -- वाटायचं की

येथून पळत सुटावं नी धावत जाऊन वहिनीच्या मांडीवर डोके ठेवावं. मग ती म्हणेल, 'काय झालं? कुणी तरी चित्तचोर म्हटलेलं दिसतय !' वगैरे.

पण आतां माझ्या समोर ध्येयाचे गाजर होते. माझे ध्येय मला गाठावयाचे होते. माझ्या दादासाठी, माझ्या वहिनीसाठी मी अभ्यासात अधिक वेळ घालवू लागलो. हळूहळू मला अधिक आवड निर्माण होऊ लागली. तस-तसा मी वहिनीला पत्र पाठवेनासा झालो. आताशा वहिनीच्या पत्रातले सूर विरहिणी आळवत असल्याचे माझ्या लक्षात येऊ लागले. नेमकं काय होतंय त्याचा मी अंदाज करू शकत नव्हतो. कारण दादा-वहिनीचा प्रेमविवाह होता. त्यामुळे दादाविषयी काही विचार करताच येत नव्हता. अन् वहिनीबाबत ! वहिनी छें! छे! वहिनी म्हणजे साक्षात् देवी. ती माझी आई! तिच्याविषयी शका घेणेसुद्धा पाप.

